रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १९ ◆ अंक ५१
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ रविवार, ६ सप्टेंबर २०२६ ◆पाने ८ ◆किंमत ₹२

## अंतरंग
शासकीय नोकरीचे आमिष दाखवून वृद्धाची फसवणूक/२
रायगडात कृष्ण जन्माष्टमी, गोपाळकाला उत्साहात/५
सात्त्विक-चिराग जोडीची उपांत्य फेरीत धडक/८

## शिक्षक दिनानिमित्त पंतप्रधान मोदींचा शिक्षकांशी संवाद

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिक्षक दिनानिमित्त निवासस्थानी राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार



विजेत्यांशी संवाद साधला. मुलांकडून मुलाखतीचा सराव करून घेणाऱ्या शिक्षिकेला मुले घरी पालकांचीही मुलाखत घेत असतील, अशी मिश्कील टिप्पणी त्यांनी केली. मुलांतील वेगळी ताकद ओळखून पुस्तकी ज्ञानापलीकडे त्यांच्या कलागुणांना वाव द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. एकलव्य मॉडेल शाळांमुळे आदिवासी कुटुंबातील मुले आयआयटी, एनआयटीचे स्वप्न पाहत असल्याचे शिक्षिकांनी सांगितले. मुलांनी मोबाइलऐवजी मैदानी खेळ व सर्जनशील कामांकडे वळावे. स्क्रीन टाइम कमी करावा. ड्रग्जचा धोका लहान शहरांपर्यंत पोहोचला असून शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या वर्तनावर लक्ष ठेवावे, असेही त्यांनी सांगितले. विज्ञान भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ४८ शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने गौरवण्यात आले.

# गोविंदा रे गोपाळाच्या जयघोषात पनवेल दुमदुमले

## गव्हाणमध्ये बासरीच्या सुरात रंगला गोपाळकाला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गोविंदा रे गोपाळा यशोदेच्या तान्ह्या बाळा... च्या जयघोषात मिडलक्लास हौसिंग सोसायटीमध्ये सोसायटी मित्रमंडळाच्या वतीने दहीहंडी उत्सव अतिशय उत्साही वातावरणात पार पडला. या उत्सवात मिडलक्लास हौसिंग सोसायटीतील रहिवाशांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. या पारंपरिक सणामुळे संपूर्ण सोसायटी परिसरात आनंदाचे आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.



या दहीहंडी उत्सवात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील आणि माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी सहभागी होऊन दहीहंडी फोडणाऱ्या पथकांना आणि लहान मुलांना सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव केला व उत्साह वाढवला.

दरम्यान, सोसायटी मित्र मंडळाची मुख्य दहीहंडी फोडण्याचा मान यंदाच्या वर्षी कोळीवाडा येथील गोविंदा पथकाने पटकावला आहे. यशस्वी गोविंदा पथकाला प्रभाग समिती सभापती अजय बहिरा यांच्या हस्ते बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. या सोहळ्याला शकुंतला ठाकूर, नगरसेविका दर्शना भोईर, नगरसेवक सुमित झुंझारराव यांच्यासह मिडलक्लास हौसिंग सोसायटीतील नागरिक आणि बालगोपाळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

गव्हाण येथील छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयात गोकुळाष्टमीचा सण अत्यंत उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, कामगार नेते महेंद्र घरत, जिप सदस्या निकिता खारकर, पंचायत समिती सदस्या जिज्ञासा कोळी, माजी उपसरपंच विजय घरत, विश्वनाथ कोळी, निलेश खारकर, भाऊ भोईर, शैलेश भगत, प्रवीण पाटील, मिनाक्षी पाटील, मनीषा ठाकूर, सुजाता पाटील, जयवंती घरत व सुधीर ठाकूर यांच्यासह अनेक मान्यवर सोहळ्यात सहभागी झाले.

(पान २...)



## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सूचनेनंतर पळस्पे-कोन मार्गावरील कामाला वेग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने पळस्पे फाटा ते कोन फाटा या मार्गावरील वाहतूक कोंडी आणि सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाची शुक्रवारी (दि. ४) पाहणी करण्यात आली. पनवेल शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी, पंचायत समिती सदस्य राजेंद्र पाटील तसेच कोळखे, डेरवली आणि कोन येथील पदाधिकारी व नागरिक यावेळी उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी या मार्गावरील वाहतूक सुरळीत करण्याबाबत संबंधित प्रशासनाला आवश्यक सूचना केल्या होत्या. त्यानुसार पळस्पे फाटा ते कोन फाटा मार्गावरील वाहतूक कोंडीची समस्या, रस्त्याची सद्यस्थिती तसेच सुरू असलेल्या रस्ते कामाचा प्रत्यक्ष पाहणीद्वारे आढावा घेण्यात आला. वाहतूक सुरळीत करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत संबंधित कंत्राटदारांशी चर्चा करण्यात आली.

यावेळी गवार कंपनीचे कंत्राटदार रोहित मलिक यांच्याशी रस्त्याच्या कामाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. रस्त्याचे काम वेगाने पूर्ण करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे भाग तातडीने मोकळे करण्यात यावेत, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या. त्यावर ९ सप्टेंबरपर्यंत रस्त्याचे संपूर्ण काम पूर्ण करून रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करण्यात येईल आणि वाहतूक सुरळीत केली जाईल, असे आश्वासन कंत्राटदार रोहित मलिक यांनी दिले.

पळस्पे फाटा ते कोन फाटा हा पनवेल परिसरातील महत्त्वाचा वाहतूक मार्ग आहे. या मार्गावर सुरू असलेल्या रस्ते कामामुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी आणि नागरिकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी (पान २...)

**खापोली :** आमदार प्रशांत ठाकूर यांनी विक्रम साबळे फाउंडेशन आयोजित दहीहंडी उत्सवास भेट दिली. यावेळी त्यांचे स्वागत करण्यात आले. भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस दीपक बेहरे, युवा नेते नगरसेवक परेश ठाकूर, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, भाजप शहराध्यक्ष अजय इंगुलकर तसेच नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी उपस्थित होते.





## मुंबईत सात वर्षीय गोविंदाचा मृत्यू

**मुंबई** : मालवणीतील चिकूवाडी परिसरात एकता वेलफेयर सोसायटी येथे दहीहंडी उत्सवादरम्यान घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेत सात वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. शनिवारी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास चिकूवाडी परिसरात दहीहंडी उत्सव सुरू होता. दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदा थरावर थर रचत असताना दहीहंडी ज्या खांबाला दोरीच्या साहाय्याने लटकवण्यात आली होती, ती दोरी तुटली. दुर्घटनेत रुद्र कदम (७) या चिमुकल्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्याला तातडीने उपचारासाठी नेण्यात आले, मात्र त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला.

## निवडक

### नेपाळ महाप्रलय : २७५ भारतीय नागरिक अजूनही बेपत्ता


**काठमांडू :** नेपाळ–तिबेट सीमेवरील ढगफुटी



आणि महापुरामुळे मोठे संकट निर्माण झाले आहे. या आपत्तीत अनेक जण अडकले असून भारतीयांचाही मोठ्या प्रमाणावर समावेश आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या माहितीनुसार आतापर्यंत १६६ भारतीय नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले, मात्र २७५ भारतीय अद्याप बेपत्ता असल्याची माहिती आहे. चीनच्या तिबेट स्वायत्त क्षेत्रात अडकलेल्या १९०७ भारतीयांनी नेपाळच्या हद्दीत प्रवेश केला आहे.

### मुंबई विमानतळावरून १२ कोटींचा हायड्रोपोनिक गांजा जप्त

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय




विमानतळावर सीमाशुल्क विभागाच्या एअर इंटेलिजन्स युनिटने ११.८२४ किलो हायड्रोपोनिक गांजा जप्त केला. याप्रकरणी बँकॉकहून मुंबईत आलेल्या एका २९ वर्षीय महिलेस अटक करण्यात आली आहे. दरम्यान, जप्त केलेल्या गांजाची एकूण किंमत ११.८२ कोटी रुपये असल्याचे तपास अधिकाऱ्यांनी सांगितले. प्रवासी प्रोफाइलिंगदरम्यान सदर महिलेच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने सीमाशुल्क विभागाच्या पथकाने तिला अडवले होते.

## जम्मू–काश्मीरमध्ये चकमकीत पाकिस्तानी कमांडर ठार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

जम्मू–काश्मीरच्या बडगाम जिल्ह्यात सुरक्षा दलांनी मोठी कारवाई करत लष्कर–ए–तोयबाचा पाकिस्तानी कमांडर ठार केला. युसमार्गच्या उंच भागात दहशतवादी असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांच्या संयुक्त पथकाने शोधमोहीम सुरू केली होती.


या चकमकीत यासिर नावाचा कमांडर मारला गेला. तो लष्कर–ए–तोयबाच्या सुलेमान मुसा गटाचा भाग होता. तो या गटापासून वेगळा होऊन स्वतंत्रपणे कार्यरत होता. मागील काही काळापासून तो युसमार्ग भागात असल्याचा संशय होता. घटनास्थळावरून एके–४७ रायफलसह इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे.

## मुख्यमंत्र्यांकडून वसुधैव कुटुंबकम मंत्र

### ग्लोबल इम्पॅक्ट फोरम २चे उद्घाटन

**मुंबई : प्रतिनिधी**

एपी ग्लोबलेतर्फे आयोजित ग्लोबल इम्पॅक्ट फोरम २चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत करण्यात आले. जगातील वाढती विभागणी, विविध संस्कृती आणि विचारांमधील अंतर कमी करण्यासाठी लोक, देश आणि सामायिक मूल्यांमधील संवाद व सहकार्याची गरज असल्याचे मत त्यांनी या वेळी व्यक्त केले.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्रीकृष्ण जयंतीचा संदर्भ देत फडणवीस यांनी समावेशकता, नीतिमत्ता आणि सत्याच्या विजयाचा संदेश स्पष्ट केला. सध्याचे जग विविध भागांमध्ये विभागले गेले असून प्रत्येक देश आणि समाजात वेगवेगळे विचार, संस्कृती आणि भूमिका आहेत, मात्र जगाकडे पाहिल्यास अनेक बाबींमध्ये साम्य आढळते. त्यामुळे भविष्यातील उद्दिष्टे, सामायिक मूल्ये व आर्थिक संवाद यांच्या माध्यमातून लोकांना एकत्र आणण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. भारत जगातील सर्वात प्राचीन संस्कृतींपैकी एक असल्याचा उल्लेख करत फडणवीस यांनी 'वसुधैव कुटुंबकम' म्हणजेच संपूर्ण जग हे एक कुटुंब असल्याच्या भारतीय विचाराची आठवण करून दिली.

## सीमेवरील जवानांसोबत इनरव्हील क्लब ऑफ पनवेलचे अनोखे रक्षाबंधन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशभक्ती आणि आपुलकीने भरलेल्या एका हृदयस्पर्शी उपक्रमांतर्गत इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या तीन सदस्यांनी अत्यंत संवेदनशील सीमेवर जाऊन भारतीय लष्कराच्या शूर जवानांसोबत रक्षाबंधन साजरे केले.

कडाक्याची थंडी, रणरणते ऊन आणि अचानक कोसळणारा पाऊस अशा लहरी हवामानात २४ तास सीमेवर तैनात असलेल्या जवानांना सण–उत्सवाची जाणीवही होत नाही. हे रक्षाबंधन त्यांच्यासाठी अविस्मरणीय व्हावे यासाठी इनरव्हील क्लब पनवेलच्या तीन रणरागिणी पीपी सुनीता जोशी, क्लब एडिटर शिल्पा चंदने आणि सदस्य वंदना बडगुजर यांनी लडाखच्या लेह जिल्ह्यातील हनुथांग गावात जाऊन ✻३१६ फील्ड रेजिमेंटच्या सुमारे १३० जवानांना राखी बांधली.

(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)



पारंपरिक मराठमोळ्या वेशभूषेत नऊवारी साडी, नाकात नथ, कपाळावर चंद्रकोर आणि इतर सांस्कृतिक दागिने घालून, राखी व मिठाई असलेले ओवाळणीचे तबक घेऊन या भगिनींनी सीमेवर महाराष्ट्रीय संस्कृतीची अनुभूती दिली. देशवासीयांच्या वतीने बांधलेल्या या राखीने आम्हाला नवी ऊर्जा मिळाल्याची भावना जवानांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमाचे यजमानपद कर्नल संजय सिंग, लेफ्टनंट कर्नल पुष्कल प्रभाकर, कॅप्टन शिवांश गुप्ता आणि सुभेदार मेजर रंजित पाटीदार यांनी भूषवले आणि आगमनापासून निरोपापर्यंतचे नेटके नियोजन केले. लष्कराच्या वतीने भगिनींना स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. लेखिका सुनीता जोशी यांनी आपल्या अमूल्य पुस्तकांची भेट रेजिमेंटच्या ग्रंथालयाला दिली व आपले मनोगत व्यक्त केले. कर्नल संजय सिंह यांनी त्यांचे आभार मानले. यावेळी स्थानिक ग्रामस्थ, शाळकरी मुले व शिक्षक उपस्थित होते. (पान २...)

## अंबरनाथच्या तरुणाचा माथेरानमध्ये दरीत कोसळून मृत्यू; मध्यरात्रीपर्यंत बचावकार्य

**नेरळ : प्रतिनिधी**

अंबरनाथ येथील सोनू जलाराम गौतम (२१) या तरुणाचा शुक्रवारी सायंकाळी माथेरानच्या अलेक्झांडर पॉइंटवरून सुमारे १,५०० फूट खोल दरीत कोसळून मृत्यू झाला. मुसळधार पाऊस, दाट धुके आणि अंधारात तब्बल साडेसात तास चाललेल्या बचावकार्यानंतर मध्यरात्री ३ वाजता मृतदेह बाहेर काढण्यात आला.



सोनू गौतम अंबरनाथच्या मटका चौक परिसरातील रहिवासी असून पेशाने रंगारी होता. शुक्रवारी तो आपल्या तीन मित्रांसोबत पर्यटनासाठी माथेरानला आला होता. सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास तिघेही अलेक्झांडर पॉइंटवर निसर्गाचा आनंद घेण्यासाठी गेले होते. यावेळी सोनू गौतम भ्रमणध्वनीवर बोलत बोलत पॉइंटच्या कडेला गेला. मित्रांनी त्याला मागे येण्यासाठी हाक दिली, मात्र काही क्षणातच त्याचा तोल जाऊन तो खोल दरीत कोसळला.

घटनेनंतर मित्रांनी तातडीने माथेरान पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच माथेरान पोलीस व सह्याद्री मित्र आपत्कालीन सामाजिक संस्था घटनास्थळी दाखल झाली. सायंकाळी ७.३० वाजता सुरू झालेले बचावकार्य जोरदार वारा, पाऊस व अंधाऱ्या दाट धुक्यात सुरू ठेवण्यात आले. दोरखंडाच्या साहाय्याने बचाव पथकाने कठीण परिस्थितीत दरीत उतरून मृतदेह बाहेर काढला. बचावकार्यानंतर सोनूचा मृतदेह नेरळ येथे आणण्यात आला.

## पुण्यात दहीहंडीचा सांगाडा अंगावर पडून महिलेचा मृत्यू

**पुणे : प्रतिनिधी**

जुन्या सांगवी परिसरात दहीहंडी उत्सव संपल्यानंतर लोखंडी सांगाडा काढताना भीषण अपघात झाला. स्ट्रक्चरचा अवजड भाग डोक्यावर पडल्याने ४५ वर्षीय सलमा सलाउद्दीन पठाण यांचा जागीच मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार दहीहंडीचा कार्यक्रम संपल्यानंतर रात्री सुमारे ११ वाजता मंडळाचे कार्यकर्ते लोखंडी सांगाडा खाली उतरवत होते. त्यावेळी स्ट्रक्चरचा एक अवजड भाग अचानक निसटून सलमा पठाण यांच्या डोक्यावर आदळला. गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

सलमा यांचा मुलगा याच दहीहंडी मंडळात सक्रिय कार्यकर्ता आहे. त्यामुळे या घटनेने पठाण कुटुंबीयांसह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## खारघरमध्ये आज रंगणार मैफिल-ए-अनुराग सुरेल संध्या

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय शास्त्रीय संगीत व सांस्कृतिक परंपरेचा समृद्ध वारसा जपण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या 'संस्कृतीर दिशारी' संस्थेच्या वतीने 'मैफिल–ए–अनुराग' या विशेष शास्त्रीय संगीत व नृत्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रेमभावना, अनुराग व भारतीय शास्त्रीय संगीत यांचा सुरेल संगम घडविणारी ही विशेष मैफल रविवारी (दि. ६) दुपारी ४ वाजता खारघर येथील पटेल हेरिटेज क्लब हाऊस, सेक्टर ११ येथे रंगणार आहे.

भारतीय शास्त्रीय संगीताच्या विविध अंगांचा आस्वाद रसिकांना एकाच व्यासपीठावर घेता यावा, या उद्देशाने कार्यक्रमाची आखणी करण्यात



आली. शास्त्रीय गायनासोबतच वादन व कथक नृत्याची बहारदार सादरीकरणे मैफिलीचे आकर्षण ठरणार आहेत. अनुभवी कलाकारांसोबतच गुणी नवोदित कलाकारांच्या सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत प्राप्त होणार आहे. या मैफिलीमध्ये सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. उमेश चौधरी, पं. प्रताप पाटील आणि विदुषी सुरंजना बासू हे प्रमुख गायक म्हणून रसिकांसमोर आपली कला सादर करणार आहेत.

# शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये सत्यनिष्ठा, देशप्रेम आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवावा -उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

**पुणे : प्रतिनिधी**

शिक्षण हे सर्वात मोठे शस्त्र असून शिक्षक ही राष्ट्राची खरी संपत्ती आहे. विद्यार्थ्यांना योग्य दिशा देण्याची महत्त्वाची जबाबदारी शिक्षकांवर आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञान न देता त्यांच्यामध्ये सत्यनिष्ठा, देशप्रेम आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.



जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित आदर्श शिक्षक पुरस्कार, अध्यक्ष चषक आणि शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सन्मान सोहळ्यात त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे, आमदार शंकर मांडेकर, बापूसाहेब पठारे, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील तसेच आदर्श शिक्षक, गुणवंत विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, पुणे ही शिक्षणाची पंढरी आहे. महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी याच भूमीत शिक्षणाची ज्योत पेटवली. या समृद्ध शैक्षणिक परंपरेत शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षक हे समाज आणि राष्ट्राचे खरे शिल्पकार असून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करण्याचे कार्य ते करतात.

त्या म्हणाल्या, राज्य शासनाने शिक्षण आणि शिक्षण क्षेत्राच्या विकासाला नेहमीच अग्रक्रम दिला आहे. बदलत्या काळानुरूप शिक्षकांनी अद्ययावत तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षणासोबतच समस्या निराकरण, टीमवर्क आणि मूल्याधारित शिक्षणाची जोड देत त्यांच्यामध्ये सद्गुणांची रुजवणूक करावी. स्पर्धेच्या युगात आत्मविश्वासाने परिस्थितीला सामोरे जाणारी सशक्त पिढी घडविण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे. विद्यार्थ्यांनी वाचन करावे, विचार करावा, प्रश्न विचारावेत, स्वतःचे मत तयार करावे आणि अपयशाची भीती बाळगू नये, असा सल्लाही उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी दिला.

राज्याच्या शिक्षण क्षेत्रात सकारात्मक आणि गुणात्मक बदल घडविण्याचा शासनाचा निर्धार असून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी मुख्यमंत्री विज्ञानवारी, गुणवंत विद्यार्थ्यांसाठी सायन्स सेंटर, समूह शाळा, आदर्श शाळा, दत्तक शाळा, प्रवेशोत्सव, आरोग्य तपासणी, सैनिकी शिक्षण, मोफत गणवेश, निपुण महाराष्ट्र अभियान यांसारखे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. शिक्षकांचे प्रश्न, शाळांमधील सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी शासन सदैव तत्पर आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# शासकीय नोकरीचे आमिष दाखवून वृद्ध व्यक्तीची फसवणूक

**महाड : प्रतिनिधी**

मुलाला शासकीय नोकरीत लावून देण्याचे आमिष दाखवत बनावट नियुक्ती आदेश व प्रतीक्षा यादी तयार करून महाड मधील ७१ वर्षीय एका वयोवृद्ध व्यक्तीची तब्बल नऊ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी महाड शहर पोलिसांनी फिर्यादी नुसार दोन आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत विनायक सहदेव हाटे (वय ७१) भीमनगर महाड यांनी महाड शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी नुसार योगेश जगन्नाथ पाटणकर, रा. खारघर, नवी मुंबई, मूळ रा. कुंभारगाव,कराड,सातारा आणि कैलास कीर्तन,रा. घणसोली, ठाणे, या दोन आरोपींने मार्च २०१७ ते २०२३ या कालावधीत संगनमत करून फिर्यादी हाटे यांना त्यांचा मुलगा विराज विनायक हाटे याला शासकीय नोकरी लावून देण्याचे आमिष दाखविले. त्यासाठी आरोपींनी महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या लेटरहेडवरील बनावट नियुक्ती आदेश, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या नावाने सार्वजनिक बांधकाम विभागातील कक्ष अधिकारी पदासाठी उमेदवारांची प्रतीक्षा यादी तसेच महसूल व वन विभागाच्या नावाने बनावट आदेश तयार करून ती कागदपत्रे हाटे व त्यांच्या मुलाला दाखवून त्यांना विश्वास दिला.

या बनावट कागदपत्रांवर विश्वास ठेवून हाटे यांनी आरोपींना वेळोवेळी ऑनलाइन तसेच रोख स्वरूपात एकूण नऊ लाख रुपये दिले. मात्र, पैसे घेतल्यानंतरही विराज याला कोणतीही शासकीय नोकरी मिळवून देण्यात आली नाही. तसेच घेतलेली रक्कमही परत करण्यात आली नाही. आरोपींनी फायद्यासाठी बनावट कागदपत्रांचा वापर करून फसवणूक केल्या प्रकरणी महाड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास महाड शहर पोलिस करीत आहेत.

# भारतीय तटरक्षक दलाच्या सहकार्याने वृक्षारोपण


**मुरुड : प्रतिनिधी**

हिंदू एज्युकेशन सोसायटी संचलित ओंकार विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयातीलविद्यार्थ्यांनी तटरक्षक दलाच्या पदाधिकाऱ्यां सोबत वृक्ष लागवडीचा कार्यक्रम केला. या उपक्रमासाठी भारतीय तटरक्षक दलाने शाळेला १०० रोपे उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्याध्यापिका प्रविता गार्डी यांनी कृतज्ञता व्यक्त केली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाची जबाबदारी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. लावलेले प्रत्येक रोप नियमित पाणी देऊन, त्याचे संरक्षण करून जगविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

# खालापुरातील बीड येथील तलावात बुडून युवकाचा मृत्यू

**खालापूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील बीड खुर्द गावा जवळील तळ्यामध्ये साहिल दीपक बडेकर हा १८ वर्षीय युवक पोहण्यासाठी गेला असता तलावामधे बुडाला. गावातील सामाजिक कार्यकर्ते सचिन कर्णूक व गावकऱ्यांना युवकाला तलावा बाहेर काढण्यात यश आले. मात्र युवक अत्यवस्थ असल्याने त्याला खोपोली नगरपालिकेच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल केले. नगरपालिका हॉस्पिटल मधील डॉक्टरांनी त्याची तपासणी केली. सिपीआर देण्याचा प्रयत्न केला मात्र कोणत्याही प्रकारची हालचाल करीत नसल्याचे लक्षात येताच त्याला मृत घोषित केले.



# शिक्षक गुणवंत विद्यार्थ्यांसोबतच सुसंस्कृत नागरिक घडविण्याचे मोठे काम करतात -वनमंत्री गणेश नाईक

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या शाळांमध्ये गुणवंत विद्यार्थी घडविण्यासोबतच सुसंस्कृत नागरिक घडविण्याचे काम अत्यंत चांगल्या प्रकारे होत असून महापालिकेच्या शाळांमधील शिक्षणाचा व संस्कारांचा दर्जा उच्च असून याचे सारे श्रेय शिक्षकांना असल्याचे मत महाराष्ट्र राज्याचे वन मंत्री गणेश नाईक यांनी व्यक्त केले. नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात शिक्षक दिनानिमित्त आयोजित गुणगौरव सोहळ्याप्रसंगी ते आपले मनोगत व्यक्त करीत होते.याप्रसंगी महापौर .सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, आरोग्य समिती सभापती डॉ.जयाजी नाथ उपस्थित होते.



शिक्षण पध्दतीत व शैक्षणिक साधनांमध्ये काळानुरूप बदल झालेला असला तरी शिक्षकांबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात असलेली आदराची भावना आजही तीच असून नवी मुंबई महानगरपालिका बदलत्या काळानुसार गुणवत्तापूर्ण शिक्षण पध्दतीत चांगले बदल घडवित असल्याबद्दल मंत्रीमहोदयांनी समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी बोलताना महापौर सुजाता पाटील यांनी महापालिकेच्या शाळेत प्रामुख्याने गोरगरीबांची मुले शिकतात हे लक्षात घेऊन प्राथमिक शाळा हा पुढील जीवनप्रवासाचा पाया असून तो पक्का करून घेण्यासाठी महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये केजीचे वर्ग इंग्रजी भाषेत सुरू केल्याची माहिती दिली. चांगला शिक्षक हा अभ्यासातले गुण वाढवतोच सोबतच व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास करतो असे सांगत महापौर महोदयांनी आपल्या शिक्षकांमुळेच नवी मुंबईच्या शिक्षण व्हिजनचा नावलौकिक सर्वत्र असल्याची भावना व्यक्त केली.

यावेळी शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत झळकलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांना मार्गदर्शन करणा-या शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे मार्च २०२६ मधील एसएससी बोर्ड परीक्षेत नवी मुंबई महानगरपालिका शाळांतून पहिल्या ३ क्रमांकाने उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणा-या शिक्षकांना गौरविण्यात आले.

# कुर्डुस गावात विहिरीवरील हंडीचा आगळावेगळा थरार

**मुरुड : रामप्रहर वृत्त**

अलिबाग पोयनाड येथील कुर्डुस गावात सॅन १९९१ पासून चालत आलेले हि अविस्मरणीय दहीहंडी चे परंपरा मानवी मनोरे न रचता विहिरीवरील दही हंडी फोडण्यासाठी आजूबाजूच्या परिसरातील दही हंडी पथके येथे येऊन हा थरार अनुभवतात तसेच या दही हंडी चे आयोजन देवळाली गोविंदा पथक कुर्डुस यांच्या मार्फत केले जाते पराग पिंगळे सचिन पिंगळे गुरुनाथ शेरामकर सुशीलकुमार पिंगळे गणेश केणी असे सर्व पिंगळे परिवार याचे कार्यवाहक म्हणून काम पाहतात आणि मोठ्या उत्सहाने हे दही हंडी साजरी करतात.

ह्यावर्षी दहीहंडीसाठी मुंबईहून पत्रकार छयाचित्रकारांची हजेरी लावली .गावकर्यांनी त्यांचे स्वागत केले

विहिरीवरील दहीहंडीचे विशेष म्हणजे जमिनीवरील मनोरे सर्वच ठिकाणी होतात .पण इकडे गावातील मोठ्या विहिरीवर आजूबाजूच्या गावातील गोविंदा हंडी फोडण्यासाठी येतात .विहिरीवर गोल कठड्यावर बसून काहीजण गोविंदाला हाताच्या पंज्यात उचलून हंडीच्या दिशेने उडवतात गोविंदानी उंच उडून दहीहंडीला हात लावून विहिरीत मध्यभागी पाण्यात पडायचं जरा अंदाज चुकला तर गोविंदा विहिरीच्या कठड्यावर पडू शकतो म्हणूनच विहिरीच्या कठड्यावर इतर गोविंदा बसलेला असतात.



# श्री गोवर्धनी माता मंदिरात आमदार मंदा म्हात्रे यांच्या उपस्थितीत गोविंदा पथकांनी दिली सलामी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि दहीहंडी उत्सवाचे औचित्य साधून नवी मुंबईतील श्री गोवर्धनी माता मंदिरात गोविंदा पथकांचा उत्साह पाहायला मिळाला. मंदिराच्या नव्याने झालेल्या जीर्णोद्धार सोहळ्यानंतर नवी मुंबई परिसरातील विविध नामांकित गोविंदा पथकांनी व दहीहंडी उत्सव मंडळांनी मंदिरात विशेष हजेरी लावली.

आमदार मंदा म्हात्रे आणि निलेश म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत मंदिरात आलेल्या सर्व गोविंदा पथकांचे पारंपरिक पद्धतीने आणि जल्लोषात स्वागत करण्यात आले. सर्व गोविंदांनी प्रथम श्री गोवर्धनी मातेच्या चरणी नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतले.

यानंतर मंदिर परिसरात गोविंदांनी अत्यंत शिस्तबद्ध, सुरक्षित आणि भव्य मानवी मनोरे रचून मातेच्या चरणी थरांची सलामी दिली. गोविंदांच्या या थरारक प्रात्यक्षिकांनी आणि 'गोविंदा गोपाळा'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.



यावेळी विविध मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार मंदा म्हात्रे आणि निलेश म्हात्रे यांचे या उत्कृष्ट आयोजनाबद्दल आभार मानले. या सोहळ्यामुळे नवी मुंबईतील दहीहंडी उत्सवाचा आनंद, उत्साह आणि भव्यता अधिकच द्विगुणित झाली.

पान १ वरुन

## गोविंदा रे गोपाळाच्या जयघोषात पनवेल दुमदुमले

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे सर्व मान्यवरांच्या हातात देण्यात आलेली पारंपरिक बासरी. श्रीकृष्णाच्या जन्मोत्सवाचे औचित्य साधत लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह सर्व मान्यवरांनी हातात बासरी धरून आणि ती ओठांशी लावत दिलेली अनोखी पोज उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती. विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, पर्यवेक्षिका शशिकला पाटील आणि लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले. कपाळावर केशरी पट्ट्या, हातात बासरी आणि श्रीकृष्ण भक्तीचा उत्साह अशा वातावरणात साजऱ्या झालेल्या या गोकुळाष्टमी सोहळ्याला विद्यार्थी, शिक्षक आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सूचनेनंतर पळस्पे-कोन मार्गावरील कामाला वेग

प्रशासन तसेच संबंधित यंत्रणांनी समन्वयाने तातडीने कार्यवाही करण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली. दरम्यान, रस्त्याचे काम निर्धारित मुदतीत पूर्ण झाल्यास या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसह कोळखे, डेरवली, कोन आणि परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे तसेच या मार्गावरील वाहतूक कोंडीची समस्या मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होणार आहे.

## सीमेवरील जवानांसोबत इनरव्हील क्लब ऑफ पनवेलचे अनोखे रक्षाबंधन

महत्त्वाकांक्षी मोहीम डिस्ट्रिक्ट E-Admin डॉ. शोभना पालेकर, प्रेसिडेंट डॉ. अमृता नाईक आणि क्लब सदस्या सुलभा निंबाळकर यांची सून आकांक्षा निंबाळकर यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे आणि प्रोत्साहनामुळे यशस्वी झाली.

हनुथांगविषयी : हनुथांग हे गाव लडाखमधील प्रसिद्ध 'आर्यन व्हॅली' किंवा 'दाह-हनु' प्रदेशाचा भाग असून सिंधू नदीच्या खोऱ्यात, लेह-कारगिल सीमेजवळ वसलेले असल्याने सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहे. २००१ मध्ये अफगाणिस्तानात तालिबानने उद्ध्वस्त केलेल्या बामियान बुद्धांच्या आठवणीसाठी येथे डोंगरात १०८ फूट उंच बुद्ध मूर्ती कोरली जात असल्याने हे गाव सध्या जगभरात चर्चेत आहे.

# कोपरखैरणे गावातील दहीहंडीला अडीच लाखाची बोली

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कोपरखैरणे गावातील श्री कृष्ण जन्माष्टमी निमित्त साजरा होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताह प्रसंगी दहीहंडीच्या ( गोपाळकाला ) दिवशी गावकी तर्फे केल्या जाणाऱ्या बोली लिलावात राजेश लालचंद्र वेटा यांचे सुपुत्र कु.हार्दिक राजेश वेटा यांनी या वर्षी २,६५,००० हजाराची बोली लावून भंगवताच्या ७ व्यांदा दहीहंडी फोडण्याचा मान मिळवला. सदर रक्कम धार्मिक आणि अध्यात्मिक कार्य करण्यासाठी देण्यात आली आहे.

सालाबाद प्रमाणे दरवर्षी कोपरखैरणे गावातील श्री राधा कृष्ण मंदिरातून पालखी मिरवणूक निघते.त्यानंतर ही पालखी मिरवणूक श्री कृष्ण जन्माष्टमी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आलेल्या श्री हनुमान मंदिरात मोठ्य ाउत्साहात पोहचते.त्या ठिकाणी दरवर्षी दहीहंडी लिलावाला सुरुवात केली जाते.त्या लिलावाच्या माध्यमातून जमलेल्या निधीतून अर्धी रक्कम श्री राधा कृष्ण मंदिराव्दारे आयोजित केलेल्या भंडाऱ्या साठी वापरात आणली जाते तर उर्वरित रक्कम ग्राम विकास मंडळाकडे सुपूर्द केली जाते.

ग्राम विकास मंडळाच्या माध्यमातून श्री कृष्ण जन्माष्टमी दिनी हरिनाम सप्ताहाला ६२ वर्षं पुर्ण झाली असून ही परंपरा अशीच अविरतपणे सुरू असेल अशी माहिती ग्रामस्थ अविनाश भरत पाटील यांनी दिली.



# तळा तालुक्यात ढाकूमाकुमच्या आवाजात गोविंदांचा गजर

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात ४ सप्टेंबर रोजी जन्माष्टमीचा उत्सव मोठ्या उत्साहात रात्रभर भक्तीभावाने पारंपारिक पध्दतीने साजरा करत दुसऱ्या दिवशी ५ सप्टेंबर रोजी सकाळी १२ वाजल्यापासून ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत गोविंदाचे आगमन झाले.

गावागावातून खळूच्या बाज्या वरती ढाकमुकूमच्या आवाजात गोविंदा रे गोपाळा म्हणत गोविंदे आनंदाने प्रत्येक गावात व तळा शहरात ही आनंदाने निघाले.ज्या भागातील गोविंदे होते त्यांनी त्यांच्या भागातील दहीहंडी फोडत मोठ्या उत्साहात हा गोपाळ काळा उत्सव साजरा केला.प्रत्येक गोविंदाच्या चेहऱ्यावरती एक वेगळा आनंद दिसत होता.लहानां पासून ते वयोवृध्दही मोठ्या उत्साहाने सहभागी झाल्याचे पहावयास मिळत होते.

अनेक ठिकाणी पारंपारिक पध्दतीने जणूकाही आध्यात्मिकतेचे एक अनोखे असे दर्शन या गोविंदाच्यातून घडत होते.दहीहंड्या काही ठराविक ठिकाणी तीन ते चार थरांपर्यंत बांधल्या होत्या.त्या दहीहंडया गोविंदांनी फोडल्या.काही ठिकाणी लहानमुलांनी श्रीकृष्णाची वेशभूषा केली होती.हातात बासरी अशा यावेशभूषेत बालगोपाल गोविंदा पथकांमध्ये सामिळ झाल्याचे चित्र पहावयास मिळत होते.



# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या प्रभाग अध्यक्षांची पाहणी



## प्रभाग 'ड'मध्ये सभापती अजय बहिरा यांच्या नेतृत्वाखाली पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सव पनवेल शहर आणि परिसरात सुरक्षित, शिस्तबद्ध तसेच उत्साही वातावरणात साजरा व्हावा या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'ड' चे सभापती अजय बहिरा यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी पाहणीदौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. उत्सव काळात भाविकांची गैरसोय टळावी, विसर्जन मागारवर वाहतूक कोंडी होऊ नये आणि गर्दीचे चोख व्यवस्थापन व्हावे, या उद्देशाने प्रशासनाने प्रत्यक्ष घटनास्थळी जात सोयी-सुविधांची पाहणी केली.

या पाहणी दौऱ्यादरम्यान सभापती अजय बहिरा यांनी प्रभाग समिती ड च्या हद्दीतील प्रभाग क्रमांक १६, १७ आणि २० मधील प्रमुख रस्त्यांसह श्री गणेशमूर्तींच्या आगमन व विसर्जन मार्गाची बारकाईने पाहणी केली. त्याचबरोबर विसर्जनघाट, परिसरातील स्वच्छता, विद्युत व्यवस्था आणि उद्यानांची सद्यस्थिती तपासूनआवश्यक त्या दुरुस्तीचे निर्देश दिले. मुख्य बाजारपेठा आणि विसर्जनस्थळांवर होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेऊन वाहतूक पोलीस आणि पालिकाप्रशासनाने परस्पर समन्वयाने चोख नियोजन करावे, तसेच विसर्जन मार्गावरीलखड्डे तातडीने बुजवून रस्ते खड्डे मुक्त करावेत, अशा सूचना सभापतींनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

या पाहणीवेळी प्रभाग समिती सभापती अजय बहिरायांच्यासह नगरसेवक संतोष शेट्टी, समीर ठाकूर, दशरथ म्हात्रे, नगरसेविका राजश्री वावेकर, श्वेता बहिरा, प्रियंका कांडपिळे , अस्मिता घरत, शिवानी घरत, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, रघुनाथ बहिरा, शिवाजी भगत, विशाल घरत, युवामोर्चा अध्यक्ष हिमेश बहिरा यांच्यासह पदाधिकारी आणि महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

## प्रभाग 'अ'मध्ये सभापती रवींद्र भगत यांच्या नेतृत्वाखाली कळंबोलीत पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती अ चे सभापती रवींद्र भगत यांच्या नेतृत्वाखाली कळंबोली परिसरातील गणेश विसर्जन व्यवस्थेची पाहणी करण्यात आली. यावेळी कळंबोली गाव, तलाव तसेच रोडपाली येथील म्हस्कोबा गणेश विसर्जन घाट या ठिकाणांचा दौरा करण्यात आला.



या पाहणी दौऱ्यात उपमहापौर प्रमिला पाटील, नगरसेवक अमर ठाकूर, नगरसेवकराजू शर्मा, नगरसेवक रामदास शेवाळे, नगरसेविका सरस्वती काथारा, नगरसेविका बायजा बारगजे तसेच पनवेल महानगरपालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.गणेशोत्सवादरम्यान भाविकांना कोणतीही अडचण येऊ नये, विसर्जन घाटांवरआवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि सुरक्षा तसेच स्वच्छतेची योग्य व्यवस्था राहावी यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

यावेळी लोकप्रतिनिधींनी विसर्जन स्थळांवरील तयारीचा आढावा घेत गणेशभक्तांसाठी सुरक्षित आणि सुरळीत विसर्जन प्रक्रिया सुनिश्चित करण्यावर भर दिला. पनवेलमहानगरपालिका गणेशोत्सव काळात सर्व यंत्रणा सज्ज ठेवून नागरिकांना सर्वोत्तमसुविधा देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## बाजारपेठांतील गर्दीमुळे वाहतूक कोंडीची शक्यता; प्रीतम म्हात्रे यांचे वाहतूक पोलिसांना पत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रमुख बाजारपेठांमध्ये गणेशमूर्ती, सजावटीचे व पूजेचे साहित्य खरेदीसाठी नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून, पनवेलसह आसपासच्या ग्रामीण भागातूनही गणेशभक्त मोठ्या संख्येने येत असल्याने वाहतूक कोंडीची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते तथा जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे अध्यक्ष प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाहतूक शाखा, पनवेल यांना पत्र पाठवून प्रमुख बाजारपेठा, चौक व प्रवेशमार्गांवर अतिरिक्त वाहतूक पोलीस बंदोबस्त तैनात करण्याची मागणी केली आहे.

पत्रात नमूद केल्यानुसार, अनधिकृत पार्किंगवर नियंत्रण ठेवून आवश्यक ठिकाणी तात्पुरते वाहनतळ, दिशादर्शक फलक व पर्यायी मार्गांची व्यवस्था करावी, तसेच रुग्णवाहिका व अन्य अत्यावश्यक सेवांच्या वाहनांसाठी मार्ग सुरळीत राहील याची दक्षता घेण्याची विनंती करण्यात आली आहे.

या कार्यासाठी पोलीस प्रशासनाला लागणारे सर्वतोपरी सहकार्य जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून केले जाणार आहे. प्रशासन व सामाजिक संस्थांच्या समन्वयातून गणेशोत्सव सुरक्षित व शिस्तबद्ध वातावरणात पार पडावा आणि गणेशभक्तांना वाहतूक कोंडीचा त्रास होऊ नये, यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी श्री. म्हात्रे यांनी केली आहे.

याप्रसंगी बोलताना प्रितम म्हात्रे म्हणाले, गणेशोत्सव हा सर्वांच्या श्रद्धेचा व आनंदाचा उत्सव आहे. या काळात गणेशभक्तांना कोणत्याही गैरसोयीला सामोरे जावे लागू नये, यासाठी प्रशासनाने वेळीच योग्य ती खबरदारी घ्यावी. आमची जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था या कामी पोलीस प्रशासनाला आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यास सदैव तत्पर आहे.

याबाबतचे पत्र पोलीस उपायुक्त (परिमंडळ२, पनवेल), पोलीस उपायुक्त (वाहतूक, नवी मुंबई पोलीस आयुक्तालय), सहायक पोलीस आयुक्त (पनवेल विभाग), आयुक्त (पनवेल महानगरपालिका) तसेच संबंधित पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीसाठी पाठवण्यात आले आहे.

## केएलई महाविद्यालयात शाडू मातीच्या गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्यावतीने माझी वसुंधरा अभियान ७.० अंतर्गत 'उत्सव गणरायाचा, जागर पर्यावरणाचा उपक्रम महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.या उपक्रमांतर्गत केएलई महाविद्यालय येथे विद्यार्थ्यांसाठी शाडू मातीच्या गणेशमूर्ती बनविण्याची पर्यावरणपूरक कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिक देण्यात आले. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे महत्त्व, शाडू मातीच्या मूर्तींचे पर्यावरणीय फायदे तसेच गणेशमूर्ती विसर्जनामुळे जलस्रोतांवर होणारा परिणाम याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली.

पनवेल महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त बाळाराम रातांबे तसेच केएलई महाविद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ. विजय डी. मेंढुळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ही कार्यशाळा घेण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा संदेश दिला. कार्यशाळेच्या समारोपावेळी उपस्थितांनी पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि निसर्ग संरक्षणाचा संकल्प केला.



## गर्भवती महिलेच्या पित्तनलिकेतून काढले १५ मोठे खडे; खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये यशस्वी उपचार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गर्भावस्थेतील नेहमीचा त्रास समजून दुर्लक्ष केलेली पोटदुखी आणि उलट्या एका २७ वर्षीय गर्भवती महिलेसाठी गंभीर ठरल्या. पोटदुखीसोबत ताप आणि डोळे पिवळे झाल्यानंतर तपासणी केली असता पित्तनलिकेत अनेक खडे अडकून संसर्ग झाल्याचे निदान झाले. रुग्ण २० आठवड्यांची गर्भवती असल्याने आईसोबतच गर्भाच्या सुरक्षिततेचे आव्हान डॉक्टरांसमोर होते. मात्र, अत्यल्प किरणोत्सर्गाचा वापर करून ERCP प्रक्रिया करत पित्तनलिकेतील ७ ते ८ मिमी आकाराचे तब्बल १५ खडे काढण्यात खारघर येथील मेडिकव्हर हॉस्पिटल्सच्या डॉक्टरांना यश आले.

गर्भवती महिलेची ही पहिलीच गर्भधारणा होती. सुरुवातीला पोटदुखी आणि उलट्या गर्भावस्थेमुळे होत असल्याचे समजून त्यांनी स्थानिक डॉक्टरांकडून उपचार घेतले. मात्र, त्रास वाढत गेला. त्यासोबत ताप, अशक्तपणा आणि डोळे पिवळे होऊ लागल्याने कुटुंबीयांनी त्यांना मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये दाखल केले.

तपासण्यांमध्ये पित्तनलिकेत खडे अडकून संसर्ग झाल्याचे स्पष्ट झाले. मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे मेडिकल गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट, हेपॅटोलॉजिस्ट आणि थेरप्युटिक एंडोस्कोपिस्ट डॉ. रावसाहेब राठोड यांनी सांगितले की, रुग्णाला तीव्र पोटदुखी, ताप आणि ऑब्स्ट्रक्टिव्ह जॉन्डिस होता. वेळीच उपचार न झाल्यास ही स्थिती गंभीर होऊ शकते. रुग्णाला तातडीने प्रतिजैविके व द्रवपदार्थ देण्यात आले. मात्र, केवळ औषधांनी समस्या दूर होणार नसल्याने ERCPद्वारे खडे काढणे आणि पित्तनलिकेत स्टेंट बसविण्याचा निर्णय घेण्यात आला.

गर्भावस्थेत ERCP करताना किरणोत्सर्गाचा धोका हे मोठे आव्हान असते. त्यामुळे गर्भाच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत संरक्षक लीड शिल्डिंगचा वापर करण्यात आला. इमेजिंग केवळ एका नियंत्रित एक्स-रे शॉटपुरते मर्यादित ठेवण्यात आले. अचूक नियोजन, अनुभव आणि तज्ज्ञांच्या समन्वयातून पित्तनलिकेतील १५ खडे यशस्वीपणे काढण्यात आले.ही प्रक्रिया अवघ्या १५ मिनिटांत पूर्ण झाली. उपचारानंतर महिलेची पोटदुखी कमी झाली आणि दुसऱ्याच दिवशी तिला घरी सोडण्यात आले.

## गणेशोत्सवासाठी खांदेश्वर पोलिसांचा मंडळांना 'शिस्तीचा डोस'

**पनवेल : वार्ताहर**

आगामी गणेशोत्सव २०२६ शांततेत, सुरक्षित आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडावा, यासाठी खांदेश्वर पोलिसांनी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेत महत्त्वाच्या सूचना दिल्या.

गणेशोत्सवासाठी जागामालक तसेच संबंधित विभागांच्या आवश्यक परवानग्या घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. शासनाने निर्धारित केलेल्या अटी-शर्तींचे पालन करूनच मंडप उभारावेत. गणेशमूर्तीची स्थापना झाल्यानंतर मंडपात दिवस-रात्र स्वयंसेवक तैनात ठेवावेत तसेच सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, अशा सूचना देण्यात आल्या. ध्वनिक्षेपक वापराबाबत सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे सांगण्यात आले. तसेच डीजे, डॉल्बी सिस्टीम आणि लेझर लाईटचा वापर करू नये, असे स्पष्ट करण्यात आले.

गणेशोत्सवातील देखावे व फलकांमध्ये कोणतेही आक्षेपार्ह स्वरूपाचे साहित्य ठेवू नये. दर्शनासाठी महिला व पुरुषांच्या स्वतंत्र रांगा ठेवाव्यात. आगमन व विसर्जन मिरवणुका रस्त्याच्या शक्यतो एका बाजूने काढाव्यात आणि गर्दी नियंत्रणासाठी शक्य असल्यास दोरीचा वापर करावा, अशाही सूचना देण्यात आल्या.दरम्यान, बैठकीस उपस्थित असलेल्या पदाधिकाऱ्यांपैकी २३ गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) कलम १६८ अन्वये नोटीस बजावण्यात आली असून, उर्वरित मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनाही नोटीस देण्यात येणार आहे.

## गोकुळाष्टमीनिमित्त पूर्व प्राथमिक विभागात दहीहंडी उत्साहात साजरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या, चांगू काना ठाकूर मराठी पूर्व प्राथमिक विभागात शुक्रवार दिनांक०४ सप्टेंबर दहीहंडी उत्सव आनंदाने साजरा करण्यात आला.या उत्सवानिमित्त आकर्षक दहीहंडीचेआयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक.सुभाष



मानकर यांनी दहीहंडीचे पूजन केले. छोटाशिशु व मोठाशिशुच्या विद्यार्थ्यांनी दहीहंडीफोडून गोपालकाला सण साजरा केला. विद्यार्थ्यांना दही-पोहे व फळे यांचा प्रसाद देण्यात आला. अशा प्रकारेहा कार्यक्रम विद्यालयात साजरा करण्यात आला.

## लोकनेते दि.बा.पाटील विद्यालय कामोठेमध्ये शिक्षक दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताचे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस हा संपूर्ण देशात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. याचे औचित्य साधून रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते दि.बा .पाटील विद्यालय कामोठे येथे विद्यार्थी शिक्षक दिन साजरा करण्यात आला.

यावेळी दहावी अ ,ब, क या तीन वर्गाचे विद्यार्थी यांनी शिक्षक म्हणून वर्ग अध्यापन, कार्यालयीन कामकाज पाहिले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या कार्याची माहिती देण्यात आली. याप्रसंगी विद्यार्थी मुख्याध्यापिका मयुरी वाघमारे, उप मुख्याध्यापक वेदांत पवार, सुपरवायझर आयान शेख आणि रायगड विभागाचे विभागीय अधिकारी कोंगेरे साहेब यांच्या हस्ते ए. आय.प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

तसेच दुपारच्या सत्रामध्ये विद्यार्थी मुख्याध्यापिका यांच्या उपस्थितीत गोपाळकाला सण उत्साह साजरा केला . समारोपाच्या वेळी उपस्थित विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद यांचा विद्यार्थ्यांकडून सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे निवेदन धनश्री कुत्तरवाडे हिने केले.




## अनोळखी इसमाचा मृत्यू

**पनवेल :** जेएनपीटी-पनवेल महामार्गावरील जुन्या टोलनाका परिसरात, निलेश ढाब्याजवळ सुमारे ६० वर्षीय अनोळखी इसम जखमी अवस्थेत आढळून आला. त्याला उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले; उपचारापूर्वीच डॉक्टरांनी मृत घोषित केले.मयताच्या उजव्या हातावरून वाहन गेल्याने पंजा व मनगटाचा चुरा झाला होता. शरीरावरही किरकोळ जखमांच्या खुणा आढळल्या. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मयताची ओळख अद्याप पटलेली नसून, त्याच्याबाबत कोणाला माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे : ८५९१४२४३५० किंवा तपास अधिकारी पोलीस नाईक रविंद्र पारधी : ७९०००३१६५१ यांच्याशी संपर्क साधावा, असे पोलिसांनी आवाहन केले आहे.

## गांजाविक्री करणाऱ्या दोघांना अटक; १५१ ग्रॅम गांजा, दुचाकीसह ८१ हजारांचा मुद्देमाल जप्त

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात अमली पदार्थांची विक्री करण्याच्या तयारीत असलेल्या दोघांना पनवेल शहर पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून १५१ ग्रॅम गांजा, प्लास्टिकची पिशवी आणि हिरो स्प्लेंडर दुचाकी असा एकूण ८१ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पनवेलमधील साईबाबा मंदिराजवळ ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत सचिन देवनारायण मोरया (वय २७, रा. शिवनेरी सोसायटी, सेक्टर १५, कळंबोली) आणि इरफान इमाम खान (वय २३, रा. मनीषा पॅराडाईज इमारत, सेक्टर १७, कळंबोली) यांना ताब्यात घेण्यात आले.

त्यांच्याकडून हिरवट पाने, फुले, काड्या व बिया असलेला गांजासदृश अमली पदार्थ जप्त करण्यात आला. या गांजाचे वजन १५१ ग्रॅम असून त्याची अंदाजे किंमत ११ हजार ५५० रुपये आहे. तसेच ७० हजार रुपये किमतीची काळ्या रंगाची हिरो स्प्लेंडर मोटारसायकलही पोलिसांनी जप्त केली.

याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम, १९८५ मधील कलम ८(क), २०(ब)(ii)(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि अभिजित पाटील, पोउपनि किरण राऊत, पोना सम्राट डाकी, पोना अनिल चव्हाण, पोशी साईनाथ मोकल आणि पोशी दत्ता जाधव यांच्या पथकाने केली.

## पार्किंगमधून २५ हजारांची दुचाकी चोरली

**पनवेल:** पनवेल शहरातील एमएमओआरडी इमारतीच्या पार्किंगमधून अज्ञात चोरट्याने सुमारे २५ हजार रुपये किमतीची हिरो कंपनीची दुचाकी चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.उमेश भागोजीसिंग सेनी (वय ३०) यांनी आपली दुचाकी एमएमओआरडी इमारतीच्या पार्किंगमध्ये उभी केली होती. दुसऱ्या दिवशी दुचाकी पाहिली असता ती पार्किंगमध्ये आढळून आली नाही.चोरीस गेलेली दुचाकी हिरो कंपनीची, २०२३ सालचे मॉडेल व काळ्या रंगाची असून तिचा क्रमांक यूके ०६ बीएच ०५२५ असा आहे.

## वाहतुकीचे नियम न पाळणाऱ्या रिक्षाचालकांवर कारवाई

**पनवेल :** शहरात वाहतुकीचे नियम न पाळणाऱ्या रिक्षाचालकांविरोधात पनवेल शहर वाहतूक शाखा आणि प्रादेशिक परिवहन विभागाच्या वतीने संयुक्त विशेष मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत १६६ रिक्षांवर कारवाई करून २ लाख ७७ हजार ६५० रुपयांचा दंड आकारण्यात आला.५ सप्टेंबर रोजी ही विशेष कारवाई करण्यात आली. पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी, शहर वाहतूक शाखा आणि सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक अनिल गेळे, यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## अग्निशमन दलाच्या जवानांचा 'सेफ इंडिया ब्रेव्हरी अवॉर्ड'ने गौरव

**पनवेल :** खारघर येथील डोंगरावर अडकलेल्या २१ वर्षीय तरुणाचे रेस्क्यू ऑपरेशन करून प्राण वाचविणाऱ्या सिडको अग्निशमन दलाच्या खारघर अग्निशमन केंद्रातील अधिकारी आणि जवानांच्या शौर्याची दखल घेण्यात आली आहे. आपत्कालीन सेवेत केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल मुंबईतील प्रसिद्ध ताज हॉटेलमध्ये आयोजित कार्यक्रमात जवानांना 'सेफ इंडिया ब्रेव्हरी अवॉर्ड्स २०२६' या पुरस्काराने सन्मानित केले.

# अमर भूपाळी होनाजी बाळा @ ७५ वर्षे

## एक संगीतमय अजरामर कलाकृती









भारतीय चित्रपटसृष्टीच्या वाटचालीतील काही दर्जेदार (क्लासिक) चित्रपट पुन्हा पुन्हा पाहावेसे वाटतात आणि त्यात पुनर्प्रत्ययाचा आनंद मिळतो. त्यात एक चित्रपट रसिक म्हणून आपल्या वयाचा टप्पाही महत्वाचा. मी शालेय वयात त्या काळातील एकपडदा चित्रपटगृह अर्थात सिंगल स्क्रीन थिएटर्स अथवा मुंबई दूरदर्शनवर शनिवारी सायंकाळी मराठी अथवा रविवारी संध्याकाळी पाहिलेला हिंदी चित्रपट त्यानंतर विविध माध्यमांतून (व्हिडिओ, उपग्रह वाहिनी, डिजिटल माध्यम) पाहताना त्यातील बारकावे अधिक प्रमाणात समजून येतात. काही चित्रपट मी एखाद्या चित्रपट महोत्सवात सिंहावलोकन विभागात अथवा अन्य एखाद्या निमित्ताने पुन्हा एकदा पाहिले अथवा पाहतो.

चित्रपती व्ही शांताराम दिग्दर्शित 'अमर भूपाळी होनाजी बाळा' हा चित्रपट अलिकडेच आशियाई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिरातील मिनी थिएटरमध्ये अद्ययावत तंत्रज्ञानात पाहिला. अर्थात पुन्हा एकदा पाहिला आणि आवडलाही. चित्रपट तारखेनुसार जुना असला तरी आता या मिनी थिएटरमध्ये साऊंड सिस्टीम आणि प्रोजेक्शन यातील आधुनिकीकरणात तो अधिकच प्रभावी वाटला. व्ही.शांताराम हे प्रभातमधून बाहेर पडले आणि १९४२ साली त्यांनी  राजकमलची तुतारी फुंकली आणि आपली चित्रपट निर्मिती व दिग्दर्शन यांची यशस्वी वाटचाल सुरु ठेवली. राजकमल कलामंदिरची स्थापना केल्यावर मुंबईत आपला स्टुडिओ हवा म्हणून त्यांनी प्रयत्न केला आणि त्यांनी जे. बी. एच. वाडिया यांजकडून सेन्ट्रल स्टुडिओ विकत घेतला. १९४२ साली अडीच लाख रुपये ही प्रचंड मोठी रक्कम होती आणि त्याचा राजकमल कलामंदिर स्टुडिओ उभारला (चित्रपट पटकथाकार व पत्रकार वसंत साठे यांच्या "बखर सिनेमाची" या पुस्तकात हा अतिशय महत्वाचा संदर्भ आहे).

असो. चित्रपटाच्या इतिहासात डोकावताना काही चित्रपट वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे दिसून येते. राजकमल कलामंदिर निर्मित, चित्रपती व्ही शांताराम निर्मित, दिग्दर्शित आणि संकलित 'अमर भूपाळी' (कवी होनाजी बाळा) हा चित्रपट असाच. या चित्रपटामुळे ग्रामीण भागातील प्रेक्षक चित्रपट पाहण्यासाठी चित्रपटगृहात येऊ लागला. हा चित्रपट २१ ऑगस्ट १९५१ रोजी सेन्सॉर संमत झाला आणि ८ सप्टेंबर १९५१ रोजी मुंबईत प्लाझा चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. या चित्रपटाच्या प्रदर्शनास पंचाहत्तर वर्षे पूर्ण होत आहेत.

हा चित्रपट कवी होनाजी बाळा यांच्या आयुष्यावर आधारित आहे. या चित्रपटाची कथा म्हणजे पेशवाई बुडाली त्या काळातील होनाजी आणि त्याचा मित्र याची कथा. विश्राम बेडेकर यांनी ही कथा व्ही. शांताराम यांना सुचवली आणि त्यांनी चिंतामण मराठे यांच्यासोबत या चित्रपटाची पटकथा लिहिली. मराठी रंगभूमीवरील गायक कलाकार पंडितराव नगरकर यांनी या चित्रपटात होनाजी बाळा ही व्यक्तिरेखा साकारली. आणि या चित्रपटाच्या यशाने त्यांना कलाकार म्हणून ओळख मिळवून दिली. अभिनेत्री संध्या यांचा हा पहिलाच चित्रपट. खरंतर या भूमिकेसाठी व्ही. शांताराम यांनी अभिनेत्री कुसुम देशपांडे यांच्या धाकट्या भगिनी रंजना यांचा विचार केला होता. या निवडीमागची एक गोष्ट आहे. व्ही. शांताराम यांनी या भूमिकेसाठी एखाद्या तरुण मुलीचा शोध सुरु केला होता. तेव्हा राजकमल कलामंदिर स्टुडिओचे मॅनेजर वासू देसाई यांच्या मित्राने एका मुलीचा लहानसा फोटो आणून दिला. हा फोटो तसा अस्पष्ट होता, पण तरीही व्ही. शांताराम यांना हा चेहरा बरा वाटला आणि त्यांनी लगेचच त्या मुलीला बोलावून घेण्यास सांगितले.

### झूम प्रहर



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

व्ही. शांताराम दुसऱ्या दिवशी 'होनाजी बाळा'ची पटकथा वाचत असताना वासू देसाई त्यांच्या खोलीत आले आणि त्यांच्या पाठोपाठ एक सतरा अठरा वर्षाची चांगली उंच, सडपातळ, गोरी मुलगी आली. तिने आपल्या कपाळावर कुंकवाचा थोडा मोठा टिळा लावला होता आणि डोक्यावरुन पदर घेतला होता. त्यामुळे ती कोल्हापूर येथील एखाद्या उच्च मराठा समाजातील युवती असावी असे वाटावे. चेहऱ्यावर रंग रंगोटी नव्हती. तिचे डोळे चांगले मोठे होते आणि नजर तीक्ष्ण होती. त्यात जराही चंचलता नव्हती.  तिच्यासोबत तिचे वडीलही होते. त्यांचे नाव श्रीधर देशमुख. फार पूर्वी ते मराठी रंगभूमीवरील श्रेष्ठ नट केशवराव भोसले यांच्या ललित कलादर्शमध्ये नट म्हणून काम करत होते. त्यांनी आपल्या या मुलीचं नाव 'विजया' असं सांगितलं. व्ही शांताराम यांनी या भेटीत या युवतीचे बोलणं, चालणं वगैरे वगैरे गोष्टी जाणून घेतल्या. आणि मग त्यानंतर त्यांचे संध्या असं नाव केले आणि एका गुणी अभिनेत्रीच्या कलाजीवनाचा प्रवास सुरू झाला. (त्या काळात विजया देसाई या नावाच्या एक अभिनेत्री कार्यरत होत्या, म्हणून व्ही. शांताराम यांनी विजया हे नाव बदलून संध्या असं नाव दिलं.)

या चित्रपटाची कथा आणि संवाद चि. य. मराठे यांचे आहेत. पटकथा विश्वास बेडेकर यांची आहे. छायाचित्रण जी. बाळकृष्ण यांचे, ध्वनिमुद्रण ए. के. परमार यांचे तर कला दिग्दर्शन पु. श्री. काळे यांचे आहे. या चित्रपटाचं चित्रीकरण परेल येथील राजकमल कला मंदिर स्टुडिओत करण्यात आले. या चित्रपटाची वैशिष्ट्ये अनेक. या चित्रपटाची गीते शाहीर होनाजी बाळा आणि अमर शेख यांची आहेत आणि संगीत वसंत देसाई यांचे आहे. आणि वसंतराव देशपांडे आणि लता मंगेशकर यांनी ही गीते गायली आहेत. या चित्रपटात एकूण अकरा गाणी आहेत. सांगा मुकुंद कुणी हा पाहिला, लटपट लटपट तुझं चालणं ग, घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला, ही गाणी आजही लोकप्रिय आहेत. यावरुन या गाण्याचा सर्वोत्तम दर्जा अधोरेखित होतो. चित्रपती व्ही शांताराम यांना गीत संगीत नृत्याची उत्तम जाण असल्याचे त्यांच्या चित्रपटांतून नेहमीच दिसले. याशिवाय या चित्रपटात घडी घडी अरे मनमोहना, तुझ्या प्रीतीचे दुःख मला दाखवू नको, सुंदरा म्हणे दिलभरा, तू पाक सुरत कामिना, गोल तुझ्या शरीराचा डौल, नको दूर देशी जाऊ सजणा, तुझी माझी प्रीत एकदा कधी, फडफड फडकतो भगवा झेंडा गगनात या गाण्यांचा समावेश आहे. विशेष उल्लेखनीय गोष्ट, घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला, ही भूपाळी अनेक वर्षे मराठी माणसाच्या घरात सकाळी ऐकली जाई.

या चित्रपटात पंडितराव नगरकर, संध्या, ललिता पवार, भालचंद्र पेंढारकर, विश्वास, गुलाब, जयराजत, निंबाळकर, अमीना, बंडोपंत सोहोनी, एम.जॉर्ज, स्ट्रोक्स, चांदोरकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. १९५२ सालच्या कान्स आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात या चित्रपटाला पॅरीस येथे उत्कृष्ट ध्वनिमुद्रण विभागात सेंटर नॅशनल डी ला सिनेमाटोग्राफिक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विशेष उल्लेखनीय गोष्ट, हा चित्रपट बंगाली भाषेत डब करून पश्चिम बंगालमध्ये प्रदर्शित करण्यात आला. व्ही. शांताराम हे आपल्या प्रत्येक चित्रपटातील गाणी कमालीची चांगली असावीत यासाठी अधिकाधिक प्रयत्नशील असत. त्यांच्या दिग्दर्शनातील 'दो आखें बारह हाथ', अमर भूपाळी होनाजी बाळा, झनक झनक पायल बाजे, 'नवरंग,' 'गीत गाया पत्थरोने,' '' डॉ. कोटणीस की अमर कहानी", पिंजरा वगैरे अनेक चित्रपटांत ते आपण पाहिले. पुन्हा पुन्हा पाहतोय.

संध्याजी राजकमल कलामंदिरच्या हुकमी नायिका. त्या नृत्यात कमालीच्या तरबेज असल्याने आणि त्यांच्याकडे उत्तम अभिनय समज असल्याने त्यांनी आपली प्रत्येक भूमिका उत्तम वठवली. आजही यू ट्यूबवर यातील कोणतेही गाणे पाहा, त्यात नृत्य आणि दृश्य सौंदर्य दिसते. मी मिडियात आल्यावर जुन्या काळातील अनेक सिनेमावाल्यांना आपण निदान प्रत्यक्षात पहावे, जमल्यास भेटावे, शक्य असेल तर मुलाखत करावी असे मला कायमच वाटे आणि विजय आनंद, मनमोहन देसाई, राज खोसला, प्रकाश मेहरा, देव आनंद यांच्या भेटीने ते साध्यही झाले. व्ही. शांताराम, राज कपूर, दिलीप कुमार यांचे प्रत्यक्षात दर्शन घडले (सिनेपत्रकारितेने मला बरेच काही दिले, त्यात हे फारच मौल्यवान). राजकमल कलामंदिर (युथ विंग)च्या किरण शांताराम निर्मित व सचिन पिळगावकर दिग्दर्शित "अशी ही बनवाबनवी" या सर्वकालीन तरुण आणि सुपरहिट चित्रपटाचा रौप्य महोत्सवी सोहळा राजकमल कलामंदिर स्टुडिओत रंगला तर चित्रपटाने प्लाझा चित्रपटगृहात पन्नास आठवड्यांचा मुक्काम केल्यावरचा सुवर्ण महोत्सवी सोहळा जुहूतील एका पंचतारांकित हॉटेलमधील स्विमिंग पूल साईटवर रंगला तेव्हा व्ही. शांताराम आणि दिलीप कुमार प्रमुख पाहुणे होते. अतिशय आदर ठेवावा अशा या चित्रपटसृष्टीतील दोन महनीय व्यक्ती. त्यांना एकाच सोहळ्यात पाहणे, ऐकणे, अनुभवणे आणि डोळ्यात साठवून ठेवण्याचे भाग्य मला लाभलयं. व्ही.शांताराम यांच्याशी यावेळेस औपचारिक भेटही घेतली. पण मी बोलणार काय?

चित्रपती व्ही. शांताराम यांच्या प्रगती पुस्तकात अशा अनेक अगणित सकारात्मक गोष्टी आहेत. आजही  राजकमल कलामंदिर स्टुडिओत पाऊल टाकताच व्ही. शांताराम (जन्म १८ नोव्हेंबर १९०१. मृत्यू ३० ऑक्टोबर १९९०) यांचे अस्तित्व नक्कीच जाणवते. चित्रपती डॉ. व्ही. शांताराम यांचे १२५वे जयंती वर्ष  १८ नोव्हेंबर २०२५ रोजी सुरु झाले आहे.  मुंबई व ठाणे येथील आशियाई चित्रपट महोत्सवात डॉ. व्ही. शांताराम यांच्या चित्रपटांचा विशेष विभाग होता. गोव्यात आयोजित  भारताच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात डॉ. व्ही. शांताराम निर्मित 'डॉक्टर कोटनीस की अमर कहानी (१९४६)' हा चित्रपट दाखवण्यात आला.

जुन्या काळातील अनेक चित्रपटांची वैशिष्ट्ये अनेक. चित्रपती व्ही. शांताराम दिग्दर्शित चित्रपट हे या माध्यम आणि व्यवसायात कारकीर्द घडवू इच्छिणाऱ्यांना तर अभ्यासच आहे. चित्रपटाचा विषय, त्याची दृश्य माध्यमातून मांडणी, त्यातील व्यक्तीरेखेनुसार निवडलेले कलाकार, चित्रपटाची श्रेयनामावली, चित्रपटाची कथा प्रवाही असेल असे गीत संगीत नृत्य, चित्रपटाचे पोस्टर, होर्डिंग्ज, इतकेच नव्हे तर मुख्य चित्रपटगृह या सर्वच बाबतीत चित्रपती व्ही. शांताराम यांचे चित्रपट एक वेगळेच स्कूल आहे. 'अमर भूपाळी होनाजी बाळा' त्याच परंपरेतील एक वैशिष्ट्यपूर्ण चित्रपट. त्याच्या प्रदर्शनास पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त हा फोकस.

---

# वसतिगृहाच्या चळवळीतून समता पेरणारे राजर्षी शाहू महाराज



भारतीय समाजसुधारणेच्या इतिहासात अनेक महापुरुषांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांनी 'शिक्षण हेच मुक्तीचे शस्त्र' मानले, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा मूलमंत्र दिला. जागतिक स्तरावरही अमेरिकेचे शिक्षणतज्ज्ञ जॉन ड्यूई, दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष नेल्सन मंडेला आणि इतर अनेक विचारवंतांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचा पाया मानले, मात्र शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली करण्यासाठी केवळ शाळा उभारणे पुरेसे नसते; विद्यार्थ्यांना राहण्याची, जेवणाची, अभ्यासाची आणि सुरक्षित वातावरणाचीही गरज असते. ही गरज ओळखून वसतिगृहांच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाची व्यापक चळवळ उभारणारे भारतातील अग्रगण्य समाजसुधारक म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज.

२६ जून १८७४ रोजी जन्मलेल्या यशवंतराव घाटगे यांना पुढे कोल्हापूरच्या राजघराण्यात दत्तक घेण्यात आले. पुढे ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज म्हणून इतिहासात अजरामर झाले. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांनी करवीर संस्थानची राज्यसूत्रे स्वीकारली. ६ मे १९२२ ला त्यांचे निधन झाले. अवघ्या ४८ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि प्रशासकीय क्षेत्रात इतके क्रांतिकारी कार्य केले की त्यांना आधुनिक भारताच्या सामाजिक क्रांतीचे शिल्पकार म्हणून गौरविले जाते.

बहुजन समाजाला अज्ञानाच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी राजर्षी शाहूंनी अनेक चळवळी उभी केल्या त्यातील सर्वाधिक प्रभावी चळवळ ही वसतिगृहांची चळवळ ठरली आहे. राज्याच्या कोषातून, राजाच्या उपयोगाच्या, मंदिराच्या डागडुजीच्या पैशाला त्यांनी वसतीगृहासाठी वळते केले. काहींना वार्षिक मदत, काहींना इमारती, काहींना जमिनी देऊन स्वतः उभे राहून त्यांनी वसतिगृहे उभारली. शाहू महाराजांच्या विचारांवर महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचा मोठा प्रभाव होता. बहुजन समाजाचे उत्थान शिक्षणातूनच होऊ शकते, हा फुले यांचा विचार शाहू महाराजांनी प्रत्यक्ष प्रशासनात उतरविला. एका शतकानंतरही आजही त्यांच्या वसतिगृहांमधून अनेकांचे आयुष्य घडत असून त्यांनी सुरू केलेली ही चळवळ जवळपास १२५ वर्षानंतरही अजूनही सक्षमपणे विद्यार्थी घडविण्याचे काम करीत आहे. कोल्हापुरात विविध ठिकाणी उभी असणारी ही वसतिगृहे छत्रपती शाहू महाराजांच्या दूरदृष्टीची कल्पना देणारे ठरतात.

सुरुवातीला सर्व जाती-धर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी एकत्रित वसतिगृहाचा प्रयोग करण्यात आला. राजाराम वसतिगृह हा त्याचा प्रारंभिक प्रयत्न मानला जातो. मात्र प्रत्यक्षात सामाजिक विषमता आणि जातीय पूर्वग्रहांमुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अपेक्षित वातावरण मिळत नव्हते. काही ठिकाणी प्रवेशाचे धोरण सर्वांसाठी खुले असले तरी प्रत्यक्ष लाभ काही मोजक्या घटकांनाच मिळत असल्याचे शाहू महाराजांच्या निदर्शनास आले. या अनुभवातून त्यांनी स्वतंत्र समाजनिहाय वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय घेतला. जातीव्यवस्थेचा पगडा समाजावरून जात नसल्यामुळे शाहू महाराजांनी काढलेला हा उपाय बहुजन समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रभावी ठरला. या वसतिगृहांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी संबंधित समाजातील सुशिक्षित आणि विश्वासार्ह व्यक्तींवर सोपविण्यात आली. त्यामुळे समाजातील नेतृत्व विकसित झाले आणि शिक्षणाची चळवळ लोकचळवळ बनली. सामाजिक परंपरा, चातुर्वर्ण्याचा प्रभाव त्यामुळे पुढे त्यांनी बहुजन विद्यार्थ्यांना वेगळी वसतिगृहे काढून जातीच्या उतरंडीच्या जोखडातून मुक्त केले.

कोल्हापूर संस्थांमध्ये १८९६-९७ ला दुष्काळ पडला. ग्रामीण भागातून मुले शिक्षणासाठी येणे बंद झाले. राहणे, खानावळ, कपडालत्ता सर्वच गरीबांना परवडणे शक्य नव्हते. ही बाब शाहू महाराजांच्या लक्षात आली याशिवाय लंडन दौऱ्यामध्ये तेथील शिक्षण पद्धतीचा अभ्यास केल्यावर त्यांना वसतिगृह ही कल्पना नावीन्यपूर्ण व परिवर्तनाची वाटली. १९०१ पासून कोल्हापूरमध्ये वसतिगृह उभारणीची व्यापक चळवळ सुरू झाली. व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग, जैन बोर्डिंग, मुस्लिम बोर्डिंग, वीरशैव लिंगायत बोर्डिंग, नामदेव बोर्डिंग, दैवज्ञ बोर्डिंग, सारस्वत बोर्डिंग, कोष्टी, आर्य समाज गुरुकुल, वैश्य बोर्डिंग, प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग, ढोर-चांभार समाजासाठी इंदुमती राणीसाहेब वसतीगृह, अनुसुचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी अर्थात अस्पृशांसाठी 'मिस क्लार्क' वसतिगृह उभारण्यात आली. संशोधनपर नोंदींनुसार शाहू महाराजांनी सुमारे २० ते २२ वसतिगृहांचे जाळे उभे केले होते.

शाहू महाराजांच्या वसतिगृह चळवळीतील सर्वाधिक महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९०८ मध्ये सुरू झालेले 'मिस क्लार्क वसतिगृह'. हे वसतिगृह अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आले होते. हजारो वर्षे ज्यांना शिक्षणापासून वंचित ठेवल्या गेले. त्या अस्पृश्य समाजाला शिक्षणाची दारे सताड उघडणारा हा क्रांतिकारी निर्णय होता. तत्कालिन व्यवस्थेत या निर्णयाची चर्चा देशभर झाली.  शाहू महाराजांची ही दूरदृष्टी आणि या निर्णयाची गरज काय होती हे त्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विदेशात शिक्षणासाठी १९२० मध्ये त्यांनी केलेल्या मदतीतून स्पष्ट होते. राजर्षी शाहू महाराजांची मागासवर्गीयांबाबतची कणव यातून स्पष्ट होते. १९०८ मध्ये स्थापन झालेले मिस क्लार्क वसतिगृह हे भारतातील दलित विद्यार्थ्यांसाठीच्या सर्वात महत्त्वाच्या शैक्षणिक उपक्रमांपैकी एक होते. गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांच्या कन्या मिस व्हायोलेट क्लार्क यांनी अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी देणगी व जनजागृतीचे कार्य केले. त्यांच्या योगदानाचा गौरव म्हणून शाहू महाराजांनी त्यांच्या नावाने वसतिगृह सुरू केले. हे वसतिगृह दलित शिक्षणाच्या इतिहासातील एक मैलाचा दगड ठरले. शाहू महाराजांनी या वसतिगृहासाठी स्वतंत्र इमारत, खेळाचे मैदान आणि आर्थिक अनुदान उपलब्ध करून दिले.

वसतिगृह ही केवळ निवासाची व्यवस्था नव्हती. तेथे निवास, भोजन, अभ्यासासाठी जागा, शिष्यवृत्ती, ग्रंथालय, शिस्तबद्ध वातावरण आणि सामाजिक जाणीव यांची सांगड घालण्यात आली होती. ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांना शहरातील शिक्षणाशी जुळवून घेण्यासाठी हे केंद्र महत्त्वाचे ठरले. आजही हे वसतीगृह सुरू असून या ठिकाणी माजी विद्यार्थ्यांकडून सुंदर इमारत उभारली आहे.

मुस्लिम विद्यार्थ्यांसाठीही त्यांनी याच काळात वसतीगृह उभारले. हे वसतिगृह सुरू असून सर्व समाजातील विद्यार्थी या ठिकाणी प्रवेश घेतात. शाहू महाराजांनी ठरवून दिल्याप्रमाणे मुस्लिम ट्रस्टद्वारे हे वसतिगृह आजही कार्यरत असून विविध मान्यवरांनी भेटी दिल्या आहेत. महाराष्ट्रात अशा पद्धतीच्या वसतिगृहांची रचना कुठेच दिसून येत नाही.  विशेष म्हणजे शंभर वर्षानंतरही हे वसतिगृह अजूनही विद्यार्थ्यांना अल्पदरामध्ये राहण्याची, जेवणाची, निवाऱ्याची, व्यवस्था करून देते.अनेक पिढ्यांना घडविण्याचे काम या दगडी कोरीव इमारतीतून झाले असून कोल्हापूरचा फेरफटका मारल्यानंतर या वास्तू आजही लक्ष वेधून घेतात.

शाहू महाराजांनी शिक्षण आणि रोजगार यांचा परस्परसंबंध ओळखला होता. शिक्षण घेतलेल्या मागासवर्गीय युवकांना नोकरीची संधी मिळाली नाही तर त्यांचा शिक्षणावरील विश्वास कमी होईल, हे त्यांनी ओळखले. त्यामुळे २६ जुलै १९०२ रोजी त्यांनी संस्थानातील सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांसाठी ५० टक्के आरक्षण जाहीर केले. भारतातील आरक्षणाच्या इतिहासातील हा एक मैलाचा दगड मानला जातो. शिक्षण, वसतिगृहे आणि आरक्षण या त्रिसूत्रीमुळे बहुजन समाजात नवे नेतृत्व निर्माण झाले.


१९१७ मध्ये त्यांनी मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा लागू केला. सात ते चौदा वर्षे वयोगटातील मुलांना शाळेत पाठविणे पालकांसाठी बंधनकारक करण्यात आले. मुलांना शाळेत न पाठविणाऱ्या पालकांवर दंड आकारण्याची तरतूदही करण्यात आली होती. काही नोंदींनुसार विलंब करणाऱ्या पालकांकडून दरमहा एक रुपया दंड आकारला जात असे.स्वतःच्या खजिन्यातून आणि देवस्थान फंडातून पैसे वळते करून शिक्षणाला महत्त्व देणारा हा राजा म्हणूनच सामाजिक क्रांतीचा जनक मानला जातो. या योजनेसाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून शाहू महाराजांनी विशेष शिक्षण कर लागू केला. डॉक्टर, वकील, सावकार, अधिकारी आणि विशिष्ट उत्पन्न गटातील घटकांकडून शिक्षण उपकर आकारण्यात येत असे. शिक्षणासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्याचा हा दूरदृष्टीचा निर्णय होता.

शाहू महाराजांच्या कार्यकाळात कोल्हापूरला 'शिक्षणाची काशी' म्हणून ओळख मिळाली. १९१७ मध्ये संस्थानात केवळ २७ शाळा आणि सुमारे १,३०० विद्यार्थी होते. मात्र १९२२ मध्ये त्यांच्या निधनाच्या वेळी शाळांची संख्या ४२० पर्यंत आणि विद्यार्थ्यांची संख्या २२ हजारांहून अधिक झाली होती.

**-प्रवीण टाके,**
उपसंचालक (माहिती),
विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर

---

# कवी, भाषा संशोधक मंजेश्वर गोविंद पै



आधुनिक कन्नड कवी व एक श्रेष्ठ संशोधक मंजेश्वर गोविंद पै यांचा आज स्मृतीदिन आहे. जन्म कर्नाटकातील द. कॅनरा जिल्ह्यातील मंजेश्वर गावी झाला. शिक्षण बी.ए.पर्यंत झाले असून विविध भारतीय भाषा, जागतिक वाङ्मय, तत्त्वज्ञान आणि इतिहास या विषयांचा त्यांनी स्वयंप्रेरणेने व्यासंग केला. विसाहून अधिक भाषा त्यांना उत्तम प्रकारे अवगत होत्या त्यांत ग्रीक व हिब्रू यांचाही समावेश होता. त्यांच्या वाङ्मयीन कारकीर्दीचा काल ६० वर्षांहून अधिक होता.

गोविंद पै यांची पहिली कविता 'सुहासिनी' ही १९०० मध्ये प्रकाशित झाली. परंपरागत द्वितीय प्रासाचा (चरणातील दुसरे अक्षर तेच येणे) उपयोग न करता रचना करणारे गोविंद पै हे पहिले कवी होत. भावगीतांव्यतिरिक्त येशू ख्रिस्ताच्या जीवनावरील गोल्गोथा (१९३१) व गौतम बुद्धाच्या जीवनावरील वैशाखि (१९४९) ही दोन खंडकाव्येही त्यांनी लिहिली. त्यांची निवडक भावगीते गिळिविंडु (१९३०) या संग्रहात आहेत. हेब्बेरळू (१९४६) व चित्रमानु (१९४९) ही त्यांची दोन नाटके. यांपैकी पहिले नाटक एकलव्याच्या कथेवरील आहे व दूसरे १९४२ च्या छोडो भारत आंदोलनातील एका हुतात्याच्या जीवनावर आधारलेले आहे. काही जपानी 'नो' नाट्यांचाही त्यांनी कन्नड अनुवाद केलेला आहे.

गोविंद पै यांच्या संशोधनपर लेखांची संख्या १६० हून अधिक भरते. त्यांत कर्नाटक आणि तुळुनाडू यांचे इतिहास, प्राचीन भारत-ग्रीस संबंध, इतिहासकालीन राजांची, गौतम बुद्ध, महावीर यांसारख्या धर्मप्रवर्तकांची आणि प्राचीन कन्नड लेखक-कवींची कालनिश्चिती इ. विषयांचा समावेश होतो. धारवाड येथील 'कन्नड संशोधन संस्थे'त दिलेली त्यांची खास व्याख्याने मुरु उपन्यासगळु (१९४०) या नावाने संगृहीत करण्यात आलेली आहेत.

दरम्यान, सर्जनशील साहित्य व ऐतिहासिक संशोधन या दोन्हीही क्षेत्रांत गोविंद पै यांना सारखीच गती होती. देशभक्ती व सर्वधर्मीय सुसंवाद साधण्याची दृष्टी ह्या त्यांच्या कर्तृत्वाच्या प्रेरणा होत. याहीपेक्षा ते मानवतावादी होते, हे अधिक महत्त्वाचे होय. ते स्वभावाने प्रसिद्धिपराङ्मुख होते. ही सर्व वैशिष्ट्ये त्यांच्या साहित्यात प्रतिबिंबित झालेली दिसतात. त्यांची भाषाशैली सहजसुबोध नाही तथापि त्यांचा वैचारिक आशय उच्च कोटीतील असल्याने त्याला एक प्रकारचे शाश्वत मूल्य प्राप्त झालेले आहे. मद्रास शासनातर्फे त्यांना १९४८मध्ये 'राष्ट्रकवि' हा पुरस्कार देण्यात आला. १९५० मध्ये मुंबई येथे भरलेल्या अखिल कन्नड साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. मंगलोर येथे त्यांचे निधन झाले.

-साभार इंटरनेट

# रायगडात कृष्ण जन्माष्टमी, गोपाळकाला उत्साहात

## आठ हजारांहून अधिक दहीहंड्यांची उधळण



**अलिबाग : प्रतिनिधी**

ढाक्कुमाकुम... ढोल-ताशांचा गजर, खालूबाजाचा ताल, गोविंदांचा जल्लोष आणि अधूनमधून बरसणाऱ्या श्रावणसरी... अशा उत्साहपूर्ण वातावरणात रायगड जिल्ह्यात कृष्णजन्माष्टमी आणि गोपाळकाला उत्सव साजरा झाला. गावागावांत पारंपरिक पद्धतीने दहीहंडी फोडण्यात आली, तर शहरांमध्ये लाखमोलाच्या राजकीय दहीहंड्यांनी उत्सवाला स्पर्धेची रंगत आणली. शुक्रवारी रात्री कृष्णजन्माष्टमीचा सोहळा धार्मिक वातावरणात पार पडला.

कथा, कीर्तन आदी कार्यक्रमांसह अलिबाग तालुक्यातील काही ठिकाणी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. अलिबाग शहरातील बालाजी मंदिर, राधा-कृष्ण मंदिर, भाल नाका यांसह विविध ठिकाणी जन्माष्टमी साजरी झाली.

आंग्रे घराण्यातही पारंपरिक पद्धतीने उत्सव साजरा करण्यात आला.शनिवारी सकाळपासूनच गोविंदांचे जथ्थे गावोगावी फिरताना दिसत होते. ग्रामीण भागात खालूबाजाच्या तालावर फेर धरत, 'तुझ्या घरात नाही पाणी घागर, रिकामी रे गोपाळा' म्हणत गोविंदा नाचत होते. घरोघरी साखळी पद्धतीने नृत्य करून अंगावर पाणी घेतल्यानंतर दही-पोह्यांचा नैवेद्य स्वीकारत पुढच्या घराकडे प्रस्थान केले जात होते.

शहरातील वातावरणही गोविंदांच्या जल्लोषाने भारावून गेले होते. 'मच गया शोर सारी नगरी रे...', 'गोविंदा आला रे आला...' आणि 'ढाक्कुमाकुम...' अशा गाण्यांवर गोविंदांचा ठेका सुरू होता. विविध रंगांचे टी-शर्ट आणि कपाळावर गोविंदा पट्टी बांधलेले तरुण दहीहंडी फोडण्यासाठी शहर आणि परिसरात फिरत होते. गल्लीबोळांपासून नाक्यानाक्यांपर्यंतच्या छोट्या-मोठ्या दहीहंड्या फोडत त्यांनी उत्सवाचा आनंद लुटला.

रायगड जिल्ह्यात यंदा आठ हजारांहून अधिक दहीहंड्या उभारण्यात आल्या होत्या. त्यापैकी सुमारे दोन हजार सार्वजनिक, तर सहा हजार खासगी दहीहंड्या होत्या. पनवेल, अलिबाग, पेण, सुधागड-पाली, रोहा, पेझारी, झिराड, खोपोली आणि कर्जत येथे लाखमोलाच्या दहीहंड्यांचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्ह्यात १६२ ठिकाणी मिरवणुका काढण्यात आल्या.अलिबाग शहरात जोगळेकर नाका, चेंढरे, मेटपाडा, रामनाथ आणि मारुती नाका आदी ठिकाणी दहीहंड्या उभारण्यात आल्या होत्या. या ठिकाणी गोविंदा पथकांनी मानवी मनोरे उभारत उपस्थितांची दाद मिळवली.गेल्या काही वर्षांत दहीहंडी उत्सवाला स्पर्धेचे स्वरूप आले असून, यंदाही रायगडमध्ये विविध राजकीय पक्षांनी दहीहंड्यांचे आयोजन केले होते. ५० हजारांपासून तीन लाख रुपयांपर्यंतची बक्षिसे जाहीर करण्यात आली होती.

त्यासोबत आकर्षक बक्षिसेही ठेवण्यात आली होती. अलिबाग, पेण, पनवेल, उरण व रोहा तालुक्यांमध्ये दहीहंड्यांची रंगत पाहायला मिळाली. बक्षिसांसाठी गोविंदा पथकांनी चार-पाच थरांपासून आठ-नऊ थरांचे मानवी मनोरे उभारले. उशिरापर्यंत दहीहंडी फोडण्याचा थरार सुरू होता. उत्सवादरम्यान कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता.




**माथेरान : बातमीदार**

माथेरान शहरात श्रीकृष्ण जन्म आणि गोकुळाष्टमीचा सण मोठ्या भक्तिभावाने आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. श्रीराम मंदिर येथे रात्री नऊ वाजल्यापासून भजनाच्या भक्तिरसात आसमंत न्हाऊन निघाला होता. स्थानिक भजन मंडळांनी अभंगांची उधळण करत श्रीकृष्ण जन्म साजरा केला.परंपरागत आरास करून महिला, पुरुष भक्तगण मंदिरात उपस्थित होते. रात्री १२ वाजता कृष्णकथा सांगण्यात आली. १२.३५ वाजता श्रीकृष्ण जन्म पारंपरिक पद्धतीने साजरा झाला.

दुसऱ्या दिवशी ५ सप्टेंबर रोजी दुपारी श्रीराम मंदिर येथे लहान बाळगोपाळांकडून मानाची दहीहंडी फोडण्यात आली. त्यानंतर सर्व मंडळांकडून दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम सुरू झाला.माथेरान शहराचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्यातर्फे श्रीराम चौक, नवरात्र उत्सव मंडळाच्यातर्फे छत्रपती शिवाजी नगर, पंचवटी मित्र मंडळाच्यातर्फे पंचवटी येथे आणि चर्मकार समाजातर्फे संत रोहिदास नगर तर रेल्वे स्थानकाच्या प्रवेशद्वारावर एस. पी. इलेव्हनच्यातर्फे दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व दहीहंड्या माथेरानमधील गोविंदा पथकांनी अतिशय आनंदी आणि उत्साही वातावरणात फोडल्या.

शनिवार विकेंड असल्यामुळे गुजरातमधून पर्यटक मोठ्या प्रमाणावर दाखल झाले होते. माथेरानमधील गोकुळाष्टमी उत्सवात त्यांनीही सहभाग नोंदवला होता. गाण्यांच्या तालावर ठेका धरत राम चौकात त्यांनी नृत्याचा आनंद घेतला. त्यातच पावसाने जोरदार हजेरी लावल्याने पर्यटक बेधुंद होऊन नाचत होते.

हा उत्सव यशस्वी करण्यासाठी ग्रामस्थ उत्सव मंडळाचे अध्यक्ष प्रकाश सुतार, चंद्रकांत जाधव, प्रदीप घावरे, अनंत शेलार, नरेश शिंदे यांनी विशेष मेहनत घेतली.



**पोलादपूर : प्रतिनिधी**

शहरात गेल्या अनेक वर्षांपासून दहीहंडी फोडण्याची शिस्तबद्ध परंपरा अस्तित्वात असून ग्रामदैवत काळभैरवनाथ देवस्थानकडून त्याचे नियोजन केले जाते. शहरातील २५ दहीहंड्या १३ वाड्या व वस्त्यांकडून फोडण्यात आल्याची माहिती दहीहंडी उत्सव मंडळाचे अध्यक्ष संतोष महाडिक यांनी दिली.

पोलादपूर शहरातील जाखमाता नगर, गोकुळ नगर, साईनाथ नगर, तांबड भुवन मित्र मंडळ, जोगेश्वरी गाडीतळ, शिवाजीनगर, सिद्धेश्वर आळी, स्वामी कवींद्र परमानंद मठ गल्ली, आनंदनगर, भैरवनाथ नगर, काळभैरवनाथ पथक व महिला मंडळ या १३ गोविंदा पथकांकडून शहरातील विविध भागांतील खासगी व सार्वजनिक दहीहंड्या फोडण्यात आल्या. काळभैरवनाथ देवस्थानतर्फे यंदाही हंडी फोडण्यासाठी विविध नगरांचे नियोजन करण्यात आले. पोलादपुरात काळभैरवनाथतर्फे दहीहंडीचे थर व उंची, राजकीय टी-शर्ट, अन्य नियमांबाबत काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाते.

त्यामुळे कुठल्याही प्रकारचे वाद अथवा गोविंदा जखमी होण्याचे प्रसंग टाळले जात आहेत. शहरामध्ये राजकीय प्रसिद्धीच्या हेतूने दहीहंडीचा गैरवापर सातत्याने टाळला जात असून सलोख्याचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.



**रोहा : प्रतिनिधी**

पावसाने शनिवारी काहीशी विश्रांती घेतली असली तरी रोह्यातील गोविंदांचा उत्साह ओसंडून वाहत होता. 'ढाक्कुमाकूम'च्या गजराने संपूर्ण रोहा तालुका दुमदुमून गेला. पारंपरिक पद्धतीने गोकुळाष्टमीचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शहरासह ग्रामीण भागातही दिवसभर गोविंदा पथकांची लगबग, दहीहंड्यांचा थरार आणि ढोल-ताशांसह डीजेच्या तालावर तरुणाईचा जल्लोष पाहायला मिळाला.रोहा तालुक्यात यंदा १५७ सार्वजनिक मंडळे, ७२ खासगी मंडळे आणि ३९ मिरवणुका अशा मोठ्या प्रमाणावर गोविंदोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे सकाळपासूनच तालुक्यातील विविध गावांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

दुपारनंतर गोविंदा पथके ठरलेल्या क्रमाने शहरातील बाजारपेठेत दाखल होत होती. वाटेत ठिकठिकाणी बांधलेल्या दहीहंड्या फोडत गोविंदांनी जल्लोष केला. उंच दहीहंड्यांचा थरार पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.शहरातील तालुका शिवसेना व आमदार महेंद्र दळवी युवा प्रतिष्ठानची दहीहंडी स्पर्धा, माजी खासदार सुनील तटकरे युवा प्रतिष्ठानची दहीहंडी, राममारुती चौकातील रोटरी क्लबची दहीहंडी, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे यांची बाजारपेठेतील दहीहंडी तसेच भाजप नगरसेवक रोशन चाफेकर यांची तीनबत्ती नाका येथील दहीहंडी ही प्रमुख आकर्षणे ठरली. या दहीहंड्यांच्या ठिकाणी गोविंदांचा थरार पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

परंपरेनुसार साईनाथ मित्र मंडळ मोरे आळी, जय गिरोबा अंधार आळी आणि 'रोह्याचा राजा' धनगर आळी या गोविंदा पथकांनी ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली शिस्तबद्ध पद्धतीने बाजारपेठेत प्रवेश केला. गौरोबा नगर-दामखाडी तसेच महात्मा फुले नगर, धावीर रोड येथील संत रोहिदास गोविंदा पथकांनीही तीनबत्ती नाका पोलिस चौकीपर्यंत येत मार्गातील दहीहंड्या फोडल्या. त्यानंतर तीनबत्ती नाका येथून नदीच्या दिशेने जात गोविंदा पथकांच्या उत्सवाची सांगता झाली.तालुक्यातील गावागावांत 'ढाक्कुमाकूम'च्या घोषणांनी वातावरण भारावून गेले होते.

अनेक गावांमध्ये युवक-युवती डीजेच्या तालावर थिरकताना दिसून आले. काही ठिकाणी पारंपरिक खालुबाजाच्या तालावर गोविंदांचा उत्साह वाढवला जात होता. आधुनिक डीजेसोबत पारंपरिक वाद्यांचा संगमही यंदाच्या गोविंदोत्सवाचे विशेष आकर्षण ठरले. गोविंदोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रोहा पोलीस निरीक्षक अभय शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी, गर्दीचे नियोजन तसेच वाहतूक सुरळीत राहावी यासाठी ५ पोलीस अधिकारी, ४५ महिला व पुरुष कर्मचारी आणि २० होमगार्ड तैनात करण्यात आले होते.

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात १६४ सार्वजनिक तर २८९ खासगी अशा ४५३ दहीहंड्या बांधण्यात आल्या होत्या. गावागावात बांधलेल्या दहीहंड्या गोविंदा पथकांनी फोडल्या.यंदा दहीहंडीच्या दिवशी सकाळी पाऊस पडत होता. त्यामुळे गोविंदांमध्ये उत्साह होता. हंडी फोडताना इमारतींवरून पाण्याच्या बादल्या नागरिक ओतत असल्याने गोविंदा खूश होते. शाळांना सुटी असल्याने चिमुकल्या गोविंदांनी सकाळपासूनच गोविंदा खेळायला सुरुवात केली.

कमी उंचीवरील दहीहंड्या फोडून त्यांनी मनसोक्त धमाल केली. सकाळपासूनच गावोगावच्या दहीहंड्या गोविंदांनी फोडण्यास सुरुवात केली होती. कर्जत शहरात उपनगराध्यक्ष संतोष पाटील यांनी एक लाख रुपयांची दहीहंडी बांधली असून ती रात्री उशिरापर्यंत फोडली नव्हती.काल रात्री काही गावांमध्ये मंदिरांमध्ये कृष्ण जन्मोत्सवाचे आयोजन केले होते. तर अनेकांच्या घरीही कृष्ण जन्मोत्सव साजरा करण्यात आला. रात्री बाराच्या सुमारास जन्मोत्सवास सुरुवात झाली. त्यानंतर कृष्णाचे पाळणे, आरत्या सुरू झाल्या. यावेळी गावोगावी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.





**कर्जत : सरनौबत नेताजी पालकर, चौक या शाळेतीत सन १९९४-९५च्या दहावीतील बॅचने माजी शिक्षकांचा सन्मान सोहळा एका माजी विद्यार्थ्याच्या स्वतःच्या मालकीच्या तुषार फार्महाऊसवर आयोजित केला होता. यावेळी शिक्षक आणि माजी विद्यार्थी उपस्थित होते.**


## अर्जंट पाहिजेत

**पनवेल मधील कन्स्ट्रक्शन व्यवसायामधील एका नामवंत कंपनीसाठी ऑफिसमध्ये कामाकरिता खालील पदाकरिंता भरती आहे.**

१) बिल्डींग कन्स्ट्रक्शन इंजिनीयर (Civil) पद - १
Building Construction Engineer (Civil) - 1

२) सेल्स एक्झिक्युटिव्ह (स्त्री) पद - १
Sales Executive (Female) - 1

३) रिसेप्शनिस्ट कम अकाऊंटट (स्त्री) पद - १
Receptionist Cum Accountant (Female) - 1

४) ऑफिस बॉय पद - १
Peon - 1

संपर्क :- 8879595974



## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीने कळविण्यांत येते की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली आमची सामाईक मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे खरोशी, ता. पेण, जि. रायगड**

| मौजे | सर्व्हे नं./गट नं. | हिस्सा नं. | पोटखराब्या सहीत एकुण क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|---|
| खरोशी | ५० | ३ | १-४६-८ | २.४० |
| खरोशी | ५० | ५ | २-९५-६ | ४.८६ |
| एकुण क्षेत्र ४-४२-४ हे.आर.चौ.मी. | | | | |

तरी सदरहू वर उल्लेखित केलेले दोनही मिळकती त्यांचे **एकत्रित क्षेत्र ४-४२-४ हे. आर. चौ. मी.** या मिळकतींवर अगर त्यातील कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, वचनचिट्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे, दरखास्त, मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **७ दिवसांच्या आत** आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील नमुद पत्त्यावर प्रत्यक्ष हजर राहून लेखी निवदेन देऊन हरकत कळवावी.

जर वरील मुदतीत कोणाकडुनही प्रत्यक्ष भेट देऊन काही लेखी हरकत अगर तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरण्यांत येईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती गृहित धरल्या जाणार नाहीत.

**दिनांक :- ०५/०९/२०२६ सही/-**

**ॲड. जयश्री नंदकुमार भोईर,**
**कार्यालयीन पत्ता गाळा नं. १ व २, सिल्व्हर आर्केड,**
**जय भारत नाका, विरुपक्ष मंदिर जवळ, पनवेल,**
**ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६**
**मोबाईल नं. ९१३०७७९४५४ / ८३७८९५६५९५**



## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी **मौजे - उसर्ली खुर्द, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड** येथिल खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक **श्री. दिलीप सदानंद जाधव,** रा. १, यशवंत पाटील चाळ, महात्मा फुले रोड, महाराष्ट्र नगर, डोंबिवली (प.), ता. कल्याण, जि. ठाणे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे - उसर्ली खुर्द, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड, येथील मिळकत**

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ५७/१ | ०-२१-५०<br>पो. ख. ०-००-२०<br>०-२१-७० | ०२-१९ |
| (सदर मिळकत ही नैना प्रकल्पांतर्गत टी.पी.एस. ७ मध्ये येत असल्याने, सदर मिळकतीच्या अनुषंगाने सदर द्वितीयपक्ष यांस मिळणार असलेल्या मौजे :- उसर्ली खुर्द येथील भूखंड क्र. ३२० ब मधील ८६८ चौ. मी. क्षेत्र | | |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबे कब्जा व वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क व अधिकार असल्याबाबत निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे. मात्र तरी देखिल वर नमूद भूखंड मिळकतीवर अगर सदरहू मिळकतीवर तिचे भागावर कोणाचाही विक्री, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, कुलमुख्यतारपत्र, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसहक्क, लिज, लिन, चार्ज, पोटगी ताबा, कब्जा, वहिवाट, इजमेन्टरी हक्क, कुळ हक्क, दिवाणी दावा, महसूल वाद, साठेकरार, त्रिपक्षीय करार, विकसन करार, फरोक्त, अटॅचमेंट, करार वगैरे या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अळावा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाच्या आत खालील आमच्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखगी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिले आहे, असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण - पनवेल
दिनांक :- ०४/०९/२०२६.
**पत्ता :** शॉप क्र. १, श्री सदन को. हौ. सो. लि.,
सिटी सर्वे नं. १२९८८, महात्मा फुले रोड, गावदेवी पाडा,
पनवेल - ४१०२०६. मो.नं. ९२२२२६७७७७

**सही/-**
**ॲड. परेश केशव गायकवाड**

# नवी मुंबईतील रस्ते सुधारणा कामांना वेग

## श्रीगणरायाच्या आगमन-विसर्जन मार्गांवर विशेष मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते सुस्थितीत ठेवण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी मागील आठवड्यात दिलेल्या निर्देशानुसार अभियांत्रिकी विभागाने रस्ते सुधारणेची विशेष मोहीम हाती घेतली आहे. या अंतर्गत प्राधान्याने श्रीगणेशमूर्तींचे आगमन विसर्जन मार्ग तसेच मुख्य रस्ते सुधारणाच्या कामाला गती देण्यात आलेली आहे.



आयुक्तांनी दिलेल्या निर्देशास अनुसरून शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिका हद्दीतील सर्व रस्त्यांची पाहणी करण्यासाठी कार्यकारी अभियंता व त्यांचे अधिनस्त अभियंत्यांचे विभागनिहाय पथक तयार करण्यात आले होते, या रोड पेट्रोलींग संकल्पनेंतर्गत गठीत करण्यात आलेल्या पथकांनी त्यांना नेमून दिलेल्या विभागांतील रस्त्यांची पाहणी केली व त्यानुसार रस्ते सुधारणेची कामे प्राधान्याने हाती घेण्यात आली आहेत. यामध्ये रस्त्यांवरील खड्डे, रस्त्यांचे खराब झालेले पृष्ठभाग, उंच-सखल पातळी, ड्रेनेज व इतर झाकणांची स्थिती याची पाहणी करून त्यांची दुरूस्ती केली जात आहे.

या अंतर्गत रस्त्यावरील खड्डे जिओ टॅग करून ते पावसाळी कालावधी असल्याने मास्टिक जिओपॉलिमर अथवा कोल्डमिक्सने भरण्यात येत आहेत. पावसाच्या उघडीपीनंतर त्याठिकाणी नियमित डांबरीकरण कार्यवाही करण्यात येणार आहे. विशेषतः मोठ्या मूर्तींच्या वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये तसेच विसर्जन मिरवणुकीदरम्यान नागरिकांना कोणतीही अडचण होऊ नये, यासाठी संवेदनशील ठिकाणांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.

गणेशोत्सवात गणरायाचे आगमन आणि विसर्जन निर्विघ्नपणे पार पडावे यासाठी रस्ते खड्डेमुक्त ठेवण्यासोबतच स्वच्छता, रस्त्यांवरील दिवाबत्ती, आणि विसर्जन स्थळांवरील आवश्यक सुविधांकडेही प्राधान्याने लक्ष देण्यात येत आहे. नवी मुंबईकर नागरिकांनी गणेशोत्सवाच्या काळात महानगरपालिका महापालिकेस सहकार्य करावे आणि रस्त्यांवर अनावश्यक अडथळे निर्माण होणार नाहीत याची दक्षता घ्यावी तसेच यंदाचा गणेशोत्सव २०२६ हा पर्यावरणपूरक, प्लास्टिकमुक्त, सुरक्षित व शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करावा, असे आवाहन महापौर सुजाता पाटील आणि आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# पदपथांवरील पानटपऱ्या हटणार

## आयुक्त कैलास शिंदेंचे निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून आवश्यक सेवासुविधा पूर्तता करतानाच नागरिकांच्या दृष्टीने महत्वाच्या बाबींकडेही अधिक काळजीपूर्वक लक्ष देण्याचे निर्देश देत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी अडथळामुक्त पदपथासाठी विशेष मोहीम हाती घेऊन गणेशोत्सवापूर्वी धडक कारवाई करण्याचे निर्देश विविध विभागांच्या आढावा बैठकीप्रसंगी दिले.

यामध्ये त्यांनी पदपथांवर नागरिकांना विनाअडथळा चालता यावे यादृष्टीने पदपथावरील अधिकृत फेरीवाल्यांना पर्यायी जागेत हलविणे आणि अनधिकृत फेरीवाले हटविणे याकडे काटेकोर लक्ष देत धडक कारवाई करण्याचे निर्देश दिले. या कारवाईत सातत्य राखण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या. प्रत्येक विभाग कार्यालयाने त्यादृष्टीने आराखडा तयार करावा, पथके तयार करावीत आणि कारवाई करावयाच्या भागाचा प्राधान्यक्रम ठरवून कारवाईत सातत्य राखावे अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या. शाळा, रूग्णालये, स्टेशन, मार्केट येथील भागावर विशेष बारकाईने लक्ष देण्याचे निर्देशित करण्यात आले.

सध्या अंमली पदार्थांच्या विळख्यात मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी सापडत आहेत याचे गांभीर्य लक्षात घेऊन कोणत्याही शाळा-महाविद्यालयाच्या बाहेर ५० मीटर परिसरात पानटपरी दिसता कामा नये असे स्पष्ट निर्देश देत आयुक्तांनी याकरिता मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्याशी समन्वय साधून सातत्यपूर्ण कारवाई करण्याचे विभाग अधिकारी यांना निर्देशित केले. यामध्ये पोलीस विभागाने संपूर्ण सहकार्य करावे असेही बैठकीस उपस्थित पोलीस अधिकाऱ्यांना सूचित करण्यात आले.

महानगरपालिकेमार्फत अनधिकृत फेरीवाल्यांवर दिवसा कारवाया करण्यात येतात, मात्र अनेक खाद्यपदार्थांच्या गाड्या सायंकाळी रस्त्यावर उभ्या राहून मध्यरात्री उशीरापर्यंत खाद्यपदार्थ विक्री करतात या प्रकारच्या प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने रात्रीच्या कारवायांसाठी पथके तयार करून रात्रीच्या कारवायाही सुरू कराव्यात असे आयुक्तांनी निर्देशित केले. त्याचप्रमाणे रात्री ११ वा. नंतर रस्त्यावर खाद्यपदार्थ विक्रीस मनाई करण्यात यावी आणि अनधिकृत फेरीवाल्यांवर अधिक प्रभावी कारवाई अगदी दररोज सातत्याने करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

रेल्वे स्टेशन व परिसरातील अंमली पदार्थ विक्री व वापर रोखण्याच्या दृष्टीने पोलीस विभागाने पुढाकार घेऊन महानगरपालिकेला सोबत घेऊन कारवायांमध्ये नियमितता ठेवावी असे सूचित करतानाच आयुक्तांनी बेघरांची वाढती संख्या व त्याचा शहर स्वच्छतेवर व नियोजनावर होणाऱ्या परिणामांचे गांभीर्य लक्षात घेऊन याबाबत मोहीम राबवावी असेही निर्देश दिले.

याशिवाय रस्त्यावर तसेच रेल्वे स्टेशनच्या पार्कींग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात धूळ खात पडलेली वाहने असून त्याचा परिणाम शहर स्वच्छतेवर होत असल्याने पोलीसांच्या सहयोगाने सर्वच विभाग कार्यालय क्षेत्रात धडक मोहीम राबवावी आणि वाहने तेथून हटवावीत अशाही सूचना आयुक्तांनी यावेळी दिल्या.

श्रीगणेशोत्सवाच्या अनुषंगाने खड्डेमुक्त रस्ते, आगमन विसर्जन मार्गांवरील झाडांची छाटणी, कृत्रीम तलाव व तेथील सर्व व्यवस्था, दिवाबत्ती सुविधा, अनधिकृत बॅनर्सवर आळा अशा विविध बाबींचा आढावा घेत योग्य ती कार्यवाही तातडीने करण्याचे निर्देश देण्यात आले.

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त डॉ.राहुल गेठे, शहर अभियंता शिरीष आरदवाड, परिमंडळ उपआयुक्त डॉ.अमोल पालवे व संजय शिंदे तसेच इतर विभागप्रमुख, विभाग अधिकारी, कार्यकारी अभियंता व पोलीस विभागाचे सहा.पोलीस आयुक्त संदेश नाईक व पोलीस निरीक्षक थिटे आणि सिडको अतिक्रमण नियंत्रण विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात जन्माष्टमी उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकुर उच्च माध्यमिक विद्यालयात दिनांक ४ सप्टेंबर या दिवशी कृष्ण जन्माष्टमीचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. भगवान श्रीकृष्णाच्या जन्माचा आनंदोत्सव साजरा करण्यासाठी जन्माष्टमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले.विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत या उत्सवाची शोभा वाढवली.

पारंपरिक वेशभूषेमुळे संपूर्ण शाळेच्या परिसरात उत्साहपूर्ण आणि सांस्कृतिक वातावरण निर्माण झाले.विशेष म्हणजे, आजच्या पिढीला भगवान श्रीकृष्ण, त्यांचे जीवनकार्य, शिकवण आणि जन्माष्टमीचे महत्त्व याबद्दल माहिती देण्यात आली. श्रीकृष्णाच्या जीवनातील मूल्ये, कर्तव्यनिष्ठा, ज्ञान आणि धर्म यांचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला.

कार्यक्रमात भगवान श्रीकृष्णाला समर्पित भक्तिगीतांचे सादरीकरण करण्यात आले. तसेच सुंदर वेशभूषेतील मुलींनी कृष्णभक्तीवर आधारित मनमोहक नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती नोंदणी प्रक्रियेबाबत जनजागृती सत्राचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात चार सप्टेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता एससी व एसटी समितीतर्फे विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती मिळावी तसेच शिष्यवृत्तीसाठी आवश्यक असलेल्या ऑनलाइन नोंदणी प्रक्रियेची सविस्तर माहिती व्हावी, या उद्देशाने शिष्यवृत्ती नोंदणी प्रक्रियेबाबत जनजागृती सत्राचे आयोजन केले होते.

या सत्राचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना उपलब्ध विविध शिष्यवृत्ती योजना, त्यासाठीची पात्रता, आवश्यक कागदपत्रे, ऑनलाइन अर्ज प्रक्रिया, नोंदणीची पद्धत, अर्ज भरताना घ्यावयाची काळजी तसेच अर्जाची स्थिती तपासण्याची प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन करणे हा होता. आर्थिकदृष्ट्या गरजू व पात्र विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती योजनांचा लाभ घ्यावा आणि कोणताही विद्यार्थी केवळ माहितीच्या अभावामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये, यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या सत्राचे प्रमुख वक्ते प्रा. विशाल देशमुख यांनी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती नोंदणी प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी ऑनलाइन अर्ज करताना आवश्यक असणारी माहिती अचूकपणे भरणे, आवश्यक कागदपत्रे योग्य पद्धतीने अपलोड करणे, अर्जाची अंतिम मुदत पाळणे तसेच नोंदणी प्रक्रियेदरम्यान येणाऱ्या संभाव्य अडचणी याबाबत विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण माहिती दिली.



महाविद्यालयाच्या प्रभारी प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी हा उपक्रम राबवल्याबद्दल आयोजकांचे आभार मानले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या. या उपक्रमाचे आयोजन प्रा. राहुल कांबळे यांनी केली तसेच समिती इतर सर्व सदस्य शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये शिष्यवृत्तीविषयक जनजागृती सत्राचे महत्त्वपूर्ण योगदान ठरले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभतेने समजून घेण्यास मदत झाली.

# छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठात गोपाळकाला उत्सव उत्साहात



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या शुभ मुहूर्तावर शेंडुंग येथील छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठात भव्य 'गोपाळकाला' उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवात विद्यापीठातील हजारो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला, ज्यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रम दरम्यान विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या बहारदार नृत्य आणि गायन सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरलेल्या फॅशन शोमध्ये विद्यार्थ्यांनी आकर्षक पोशाखांसह आपल्या कलागुणांचे दर्शन घडवले. 'मिस खारघर २०२६' तनिषा माझी (Tanisha Maji) यांनी फॅशन शोचे परीक्षक म्हणून काम पाहिले, तर 'तारा ज्वेलरी' (Tara Jewellery) यांनी या कार्यक्रमाचे प्रायोजकत्व (Sponsorship) भूषवले.

या प्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव (Registrar) डॉ. आर. पी. शर्मा, कुलगुरू (Vice-Chancellor) डॉ. प्रा. के. एल. वर्मा यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी आणि हजारो विद्यार्थी उपस्थित होते. अशा सांस्कृतिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आपल्या कलागुणांना वाव मिळण्यासोबतच भारतीय संस्कृती आणि परंपरांशी जोडले जाण्यास मदत होते, असे मत विद्यापीठ प्रशासनाने व्यक्त केले.'गोविंदा आला रे'च्या गजरात पारंपारिक दहीहंडी उत्सवाने कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली.

# २५ वर्षीय तरुण बेपत्ता

**पनवेल** : वाशी खाडीपुल परिसरातून २५ वर्षीय शुभम अनंत घाग हे बेपत्ता झाले आहेत. याप्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात मिसिंग नोंद करण्यात आली आहे.शुभम घाग हे अंगाने सडपातळ, गोऱ्या रंगाचे असून त्यांची उंची सुमारे ५ फूट ३ इंच आहे. त्यांचे नाक सरळ, डोळे काळे असून दाढी-मिशी बारीक आहे. त्यांच्या डाव्या हातावर 'ॐ नमः शिवाय' असा टॅटू गोंदवलेला आहे. बेपत्ता होताना त्यांनी निळ्या रंगाची जीन्स परिधान केली होती.त्यांच्याकडे सॅमसंग कंपनीचा मोबाईल, रेडमी नोट टॅब आणि काळ्या रंगाची सॅकबॅग असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. ते मराठी व हिंदी भाषा बोलतात.



# 'गणेशोत्सवाआधी दिघा परिसरातील रस्ते खड्डेमुक्त करा'

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

दिघा विभागातील विविध नगरातील अंतर्गत रस्ते तसेच ठाणे बेलापूर रस्ता हा गणपती बाप्पाचे आगमनापूर्वी खड्डे मुक्त करण्याचे तसेच दिघा येथील गणपती बाप्पा तलावाजवळील पदपथ तातडीने दुरुस्त करण्याची मागणी भाजपा नगरसेविका अपर्णा गवते यांनी नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांना निवेदन देऊन केलें. या प्रसंगी शहर अभियंता शिरीष आरदवड देखील उपस्थित होते.



अपर्णा गवते यांनी आपल्या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, दिघा विभागातील विविध नगरातील अंतर्गत रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली असून अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत, ज्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. त्याचप्रमाणे ठाणे-बेलापूर रस्ता हा रस्ता सुध्दा अतिशय खराब झाला असून जागोजागी खड्डे पडले असल्याने रहदारीचे समस्या गंभीर झाली असून अपघातांचे प्रमाण सुद्धा वाढले आहे.

तसेच दिघा येथील गणपती बाप्पा तलावाजवळील पदपथावर काही लोखंडी रॉड पदपथाच्या बाहेर आले असून त्यामुळे नागरीकांना गंभीर दुखापत होऊ शकते.

# वाशीत अखिल भारतीय राजभाषा संमेलन

## केंद्रीय गृहमंत्री अमित शहांची उपस्थिती

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र सरकारच्या राजभाषा विभागामार्फत दि. १४ व १५ सप्टेंबर २०२६ रोजी सहावे अखिल भारतीय राजभाषा संमेलन वाशी, नवी मुंबई येथील सिडको प्रदर्शनी केंद्र येथे संपन्न होत असून या कार्यक्रमाकरिता देशभरातून मोठ्या संख्येने शासकीय, सार्वजनिक उपक्रम व बँकांमधील अधिकारी, कर्मचारी सहभागी होणार आहेत. तसेच केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांचीही प्रमुख उपस्थिती असणार आहे.



नवी मुंबईत संपन्न होणाऱ्या या मोठ्या स्वरूपाच्या राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमानिमित्त स्थानिक प्राधिकरण म्हणून नवी मुंबई महानगरपालिकेची महत्वाची भूमिका लक्षात घेत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी महापालिकेसह पोलीस, वाहतुक पोलीस, सार्वजनिक बांधकाम विभाग, सिडको अशा संबंधित प्राधिकरणांच्या अधिकाऱ्यांची विशेष बैठक घेत सदर कार्यक्रम सुव्यवस्थित रितीने पार पाडण्यासाठी त्या त्या प्राधिकरणाशी संबंधित कार्यवाही काटेकोरपणे करण्याचे निर्देश दिले.

महानगरपालिकेच्या वतीने परिमंडळ १ चे उपआयुक्त डॉ.अमोल पालवे यांची सदर कार्यक्रमाच्या समन्वयासाठी नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. आयुक्तांनी घेतलेल्या या नियोजन बैठकीमध्ये भारत सरकारमार्फत या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी नोडल अधिकारी लेफ्टनंट कर्नल राम नरेश शर्मा यांनीही मौलिक सूचना केल्या.

# एनआरबी स्कूलमध्ये शिक्षक दिन साजरा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

एनआरबी एज्युकेशनल, सोशल अँड कल्चरल ट्रस्ट संचलित 'शिक्षण प्रसारक विद्यालय, एन. आर. भगत इंग्लिश स्कूल आणि कॉलेज नेरूळ' येथे शिक्षक सन्मान दिन सोहळा संस्थेचे अध्यक्ष नामदेव भगत , प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त ज्येष्ठ शिक्षक मोहनलाल तेली, एन आर बी ट्रस्टचे खजिनदार अशोक पाटील यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाला.




कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि ईशस्तवनाने झाली. या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षकांचा विशेष भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. यावेळी अध्यक्षीय भाषणात अध्यक्ष नामदेव भगत यांनी बोलताना सांगितले की,कोणत्याही शैक्षणिक संस्थेचा आणि समाजाचा भक्कम पाया हा कार्यनिष्ठ शिक्षकांवर आधारलेला असतो.

या प्रसंगी आपल्या मनोगतात माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक शेखर जगताप म्हणाले, शिक्षक हा केवळ वर्गात शिकवणारा घटक नसून विद्यार्थ्यांच्या आयुष्याला योग्य दिशा देणारा शिल्पकार असतो. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगातही शिक्षकाचे स्थान व महत्त्व अबाधित आहे. आमच्या शाळेतील प्रत्येक शिक्षक निष्ठेने आणि समर्पणाने काम करत असल्याचा मला मुख्याध्यापक म्हणून सार्थ अभिमान आहे.

या सोहळयास प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका वंदना पाटील, कॉलेजच्या प्राचार्य प्रियांका पुंड ,इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका प्रीती त्रिपाठी यांच्यासह संस्थेत कार्यरत असलेले सुमारे ६० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# ‘शिक्षक आपल्या सर्वांच्या आयुष्यातील अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश पसरवतात’

**चौक : प्रतिनिधी**

शिक्षक आपल्या आयुष्यातील अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश पसरवतात ते मार्गदर्शक आणि शिल्पकार असून केवळ पुस्तकी ज्ञान देत नाहीत, तर आपल्या भविष्याला योग्य आकार देणारे खरे शिल्पकार आहेत,असे भावपूर्ण उदगार खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे यांनी काढले.खालापूर पंचायत समितीच्यावतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून शनिवारी खालापूर तालुक्यातील ३६६ शिक्षकांचा विशेष सन्मान खालापूर पंचायत समितीच्या



सभागृहात करण्यात आला, या कार्यक्रमात सभापती बोलत होते.

आई-वडिलांनंतर आपल्याला चांगल्या-वाईटाची जाणीव करून देणारे आणि संस्कारांची शिदोरी देणारे शिक्षकच असतात, आपण आयुष्यात कितीही मोठे झालो, तरी आपल्या यशाचा पाया शिक्षकांनीच रचलेला आहे, असे जिल्हा परिषद सदस्य संतोष बैलमारे,रेश्मा पाटील, पंचायत समिती सदस्य प्रमिला पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले. स्वतः एकाच ठिकाणी राहून आपल्या विद्यार्थ्यांना यशाच्या शिखरावर पोहोचवणारे शिक्षक हे समाजातील सर्वात आदराचे स्थान आहेत,असे सहाय्यक गटविकास अधिकारी प्रदीप कांबळे, गट शिक्षण अधिकारी राजवर्धन नाईक यांनी सांगितले.

यावेळी पंचायत समिती सदस्य देवयानी देशमुख, कमल भसमा, अर्चना भोईर,.गौरी गडगे, सामाजिक कार्यकर्ते कैलास म्हात्रे, महादेव गडगे,राम भसमा,तालुक्यातील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.खालापूर तालुक्यासाठी ४२५ शिक्षक पदे मंजूर असून ३९० शिक्षक कार्यरत आहेत,३५ शिक्षकांची गरज आहे.

खालापूर पंचायत समितीच्या इतिहासात प्रथमच शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. आज गोपाळकाला असतानाही शिक्षकांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.यावेळी सेवा निवृत्त शिक्षक, सामाजिक कार्यात सहभागी असणारे शिक्षक, आदर्श शिक्षक यांचाही सत्कार करण्यात आला.

## तळा तालुक्यात श्रावण मासात गावागावात साजरे होतात नवोपक्रम

**तळा : प्रतिनिधी**

तालुक्यात श्रावण मास चालू झाला की विविध सण उत्सव साजरे होत असतात.या सण उत्सवात गावागावातून उत्सव साजरे करताना एक नवचैतन्य नागरिकांमधून निर्माण होताना दिसत आहे.त्याच बरोबर प्रत्येक सण उत्सवापुर्वी गावकरी गावाची स्वच्छता करत असतात.यामुळे गाव चकाचक दिसतात.

तालुक्यात असणारी शिवालये,मंदिरे यांच्यामधे सोमवार, शनिवार या दिवशी व्रतवैकल्ये अधिक प्रमाणात होतात.तेव्हा महिला व नागरिक एकत्र येऊन मोठ्या उत्साहात व आध्यात्मिक पध्दतीने ही व्रतवैकल्ये साजरे करत आहेत.महिलांमधे एक वेगळे चैतन्य पहावयास मिळते.तसेच गावागावातील मंदिरांमध्ये लावले जाणारे ग्रंथ जे श्रावण मासात रात्री महिनाभर चालू असतात.यातून एकमेकांचे विचार व देवदेवतांची माहिती मिळते.संस्कार घडले जातात.

त्याच बरोबर तालुक्यातील अनेक मंदिरांमध्ये श्रावणमासात सध्या भजन मंडळी भजन घेत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.यामुळे गायन कलाशिकण्यास यातून एक प्रोत्साहन मिळत आहे.तसेच गावाच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने चर्चा केली जाते.या कालावधीत अनेक गावांतून स्वच्छतेचा उपक्रम राबविले जात आहेत.स्वच्छता हा उपक्रम आठवड्यातून एक दिवस गावासाठी असा उपक्रम अनेक गावांतून चालू आहे.

गणेशोत्सवही जवळ आला असून सर्वत्र आता बाजार पेठ चकाचक होऊन नवनवीन` साहीत्य दिसत आहे.घराघरांची रंगरंगोटी चालू झाली आहे.

## पूर्वजांच्या मातीची ओढ; सातमकर बंधू-भगिनींची विघवलीला ऐतिहासिक भेट

**माणगाव : बातमीदार**

बेने इस्रायली ज्यू समाजाच्या नव्या पिढीतील बेन, खनोक आणि नॅन्सी सातमकर यांनी आपल्या पूर्वजांच्या भूमीशी असलेले ऐतिहासिक व भावनिक नाते पुन्हा अनुभवण्यासाठी बुधवार, दि. २ सप्टेंबर रोजी माणगाव तालुक्यातील विघवली गावाला भेट दिली. त्यांच्या या भेटीमुळे कोकणातून इस्रायलमध्ये स्थलांतरित झालेल्या बेने इस्रायली समाजाच्या ऐतिहासिक मुळांना पुन्हा उजाळा मिळाला.

बेने इस्रायली समाजाचा संबंध रायगड जिल्ह्यातील रोहा परिसरातील विरजोळी (सातंबा) गावाशी असल्याचे सांगितले जाते. अनेक वर्षांपूर्वी या समाजातील कुटुंबांनी इस्रायलमध्ये स्थलांतर केले. पुढील पिढ्या इस्रायलमध्ये स्थायिक झाल्या असल्या तरी आपल्या पूर्वजांची भूमी, संस्कृती आणि कोकणच्या मातीशी असलेली नाळ आजही कायम असल्याचे या भेटीतून जाणवले.



त्यांच्या आगमनाची माहिती मिळताच ग्राम विकास समितीचे पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक, युवक, विद्यार्थी तसेच समस्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने मंदिर परिसरात उपस्थित झाले.यावेळी सचिन उभारे, विठोबा दळवी, बेंडखळे गुरुजी, ह.भ.प. अनंत विचारे, अजित जंगम, विनायक सापळे, विश्वास सापळे, वसंत साठे, किशोर बेंडखळे, नथुराम विचारे, अरविंद सालदूर, विकेश सापळे, अनिल मानकर, नागेश शेपुंडे, विजय सापळे, वंदन सापळे, बाळाराम शेपुंडे, दत्ता उभारे, भागोजी सापळे, शरद सापळे आदींसह ग्रामस्थांनी सातमकर कुटुंबीयांचे अत्यंत आपुलकीने स्वागत केले. इस्रायलच्या प्रगतीची माहिती ऐकून ग्रामस्थ भारावलेग्रामस्थांशी झालेल्या संवादात बेन, खनोक आणि नॅन्सी सातमकर यांनी इस्रायलने विविध क्षेत्रांत केलेल्या उल्लेखनीय प्रगतीची माहिती दिली. संरक्षण, जलव्यवस्थापन, आधुनिक शेती, शिक्षण, बँकिंग, महिला सक्षमीकरण आणि तंत्रज्ञान अशा अनेक क्षेत्रांत इस्रायलने केलेल्या विकासाचा त्यांनी संक्षिप्त आढावा मांडला.

विशेषतः पाण्याचा कार्यक्षम वापर, आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि संरक्षण क्षेत्रातील प्रगती याबाबतची माहिती ग्रामस्थांसाठी उत्सुकतेचा विषय ठरली. प्रतिकूल परिस्थितीतही इस्रायलने विविध क्षेत्रांत केलेली झपाट्याने प्रगती ऐकून ग्रामस्थ भारावून गेले.या संवादादरम्यान भाषेची अडचणही फारशी जाणवली नाही. हिंदी, इंग्रजी आणि मराठी या भाषांचा सोयीस्कर वापर करण्यात आल्याने सातमकर कुटुंबीय आणि ग्रामस्थ यांच्यात मनमोकळा संवाद झाला.

विघवलीतील झालेली ही भेट केवळ औपचारिक भेट न राहता इतिहास, संस्कृती, विकास, श्रद्धा आणि माणुसकीच्या नात्याचा भावनिक संगम ठरली. इस्रायलमध्ये स्थायिक झाल्यानंतरही आपल्या पूर्वजांच्या मातीची ओढ नव्या पिढीत कायम असल्याचे या भेटीतून प्रकर्षाने अधोरेखित झाले.

## माथेरानच्या विद्यार्थ्यांनी समजून घेतला टपाल खात्याचा कारभार



**माथेरान : बातमीदार**

माथेरान पर्यटनस्थळी ब्रिटिश काळापासून टपाल सेवा अविरत सुरू असून एक हेरीटेज वास्तू म्हणून टपाल कार्यालय उभे आहे.या टपाल कार्यालयात पोस्टाच्या विविध योजना,पोस्टाची पाकिटे तसेच माथेरान टपाल कार्यालयातील कामकाज हे कश्या प्रकारे चालते याची माहिती मिळवण्यासाठी माथेरान मधील गव्हाणकर शाळेच्या विद्यार्थ्यांनी या टपाल कार्यालयाला भेट देत टपाल खात्याचा कारभार समजावून घेतला.

माथेरानसारख्या दुर्गम भागात टपाल सेवा वर्षानुवर्षे सुरू आहे.ही सेवा देणाऱ्या कार्यालयातून शिक्षणाचा एक भाग म्हणून टपाल खात्याचा कारभार समजून घेतला.

## अशोक लोखंडे विद्यामंदिरात ‘चमत्कारामागील विज्ञान’ विषयावर प्रबोधनात्मक व्याख्यान



**मुरुड : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी आणि समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी अशोक ल. लोखंडे विद्यामंदिर, पिटसई येथे 'चमत्कारामागील विज्ञान, भुतं आणि भानामती' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला मुख्य व्याख्याते म्हणून ‘महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती’चे (अंनिस) संदेश गायकवाड उपस्थित होते. त्यांनी हसत-खेळत आणि विविध प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून भोंदू बाबा व बुवा कशा प्रकारे चमत्कारांचा आव आणून लोकांची फसवणूक करतात, याचा पर्दाफाश केला.

भूत-प्रेत ही मानवी मनाची कल्पनाः भूत किंवा आत्मा ही संकल्पना पूर्णपणे काल्पनिक असल्याचे सांगत संदेश गायकवाड म्हणाले, "जगात भूत किंवा आत्मा अस्तित्वातच नाही. जर भूत असते, तर प्राणी आणि पक्षांचेही भूत दिसले असते. मात्र, नेहमी त्रास देणाऱ्या माणसाचेच भूत का लागते? एखाद्या हुशार माणसाचे भूत लागून एखादा मंद विद्यार्थी अचानक हुशार झाल्याचे कधी घडले आहे का?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

भोंदू बाबा आणि मांत्रिकांच्या नादी न लागण्याचे आवाहन करत, "हे मांत्रिक फक्त आर्थिक शोषण करत नाहीत, तर अनेकदा लैंगिक शोषणही करतात. अशा जाळ्यात अडकल्यास बाहेर पडणे कठीण होते," असा गंभीर इशारा त्यांनी विद्यार्थिनींना दिला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी 'अंनिस' तळा शाखेने विशेष मेहनत घेतली.सदर कार्यक्रमाला अनिसचे जिल्हा प्रधानसचिव अमित निंबाळकर, रोहा प्रतिनिधी धनाजी जाधव, तळा शाखेचे अध्यक्ष रमेश गायकवाड, महिला अध्यक्ष रेश्मा गायकवाड, काजल गायकवाड, अक्षय गायकवाड तसेच महादेवजी गोळे (विश्वस्त)गणपतजी जगताप (चेअरमन)मुलाणी सर (मुख्याध्यापक),तेलंगे सर, सर्जे सर, ठमके सर, रेखा रेडीज मॅडम,इंगवले सर, बांगर सरवं इतर मान्यवर, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस पाटलांची भूमिका महत्त्वाची

**चौक : प्रतिनिधी**

गोपाळकाळा व गणेशोत्सव यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी गाव पोलीस पाटील यांचे सहकार्य व व्यवस्थापन महत्वाचे आहे, असे प्रतिपादन खालापूर पोलीस निरीक्षक प्रदीप रायण्णावर यांनी यांनी केले आहे.

गोपाळकाला व आगामी गणेश उत्सव अनुषंगाने खालापूर पोलीस ठाणे हददीतील सर्व पोलीस पाटील यांची खालापूर पोलीस ठाणे येथे बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत प्रदीप रायण्णावर पोलीस निरीक्षक खालापूर हे गावपोलीस पाटील यांना मार्गदर्शन करताना प्रतिपादन केले. यावेळी सर्व सावर्जनिक गणेश मंडळांनी ऑनलाईन आपले सरकार व citizen पोर्टल यावर परवानगी घेणे,गणेश मुर्ती सुरक्षेसाठी



स्वयंसेवक नेमावेत. मुर्ती व मंडप परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे लावणेबाबत सूचना केल्या,

आगामी सण उत्सव कालामध्ये कुठेही अवैद्य धंदे चालणार नाहीत याची माहिती देणे, आगामी सण उत्सवामध्ये जातीय, धार्मिक तेढ निर्माण होणारे बॅनर, देखावे, चित्रफिती प्रसारित करू नये,कोणत्याही मिरवणूक मार्गात काही अडथळे असल्यास त्याबाबत माहिती देण्यात यावी,गरबा दांडीया ठिकाणी महिला, मुली छेडछाड, विनयभंग यासारख्या घटना होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. महिला सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना कराव्यात,विसर्जन मिरवणुक वेळी DJ, डॉल्बी ऐवजी पारंपारिक वाद्य वापरणे बाबत मंडळांना सांगावे.पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष अनंत ठोंबरे यांच्यासह ३५ पोलीस पाटील बैठकीस हजर होते.

## सभापती कृष्णा पारंगे यांच्या मध्यस्थीने रिलायन्स कामगारांचे आंदोलन स्थगित



**चौक : प्रतिनिधी**

रिलायन्स ठेकेदार कामगार यांनी पुकारलेला धडक मोर्चा खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे यांच्या यशस्वि मध्यस्थीने स्थगीत करण्यात आला असून उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.विशाल नेहुल यांच्या दालनात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून गणपती सणापूर्वी चा तणाव शांत झाला आहे. :

७ सप्टेंबर २६ रोजी रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड रसायनी, पातळगंगा कंपनीवर १८०० कामगार यांचा मोर्चा निघणार होता. या मोर्चात कामगारांनी कुटुंबीयांसह कंपनी गेटवर जाण्याचा निर्णय घेतला होता.याबाबत सर्व कामगार व त्यांचे प्रतिनिधी यांनी सभापती कृष्णा पारंगे यांची भेट घेतली होती.सभापती कृष्णा पारंगे यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल नेहुल,कामगार आयुक्त, पोलीस निरीक्षक भुजबळ व रिलायन्स इंडस्ट्रीज व्यवस्थापन, कामगार नेते यांच्याशी चर्चा केल्यावर ८ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता,कामगार आयुक्त यांनी त्यांच्या खांदा कॉलनी पनवेल येथे व्यवस्थापन प्रतिनिधींशी बैठक निश्चित केल्याने हा मोर्चा स्थगित करण्यात आला असल्याचे कामगार नेते व प्रतिनिधी यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल नेहुल यांच्या कार्यालयात जाहीर केले.

यावेळी भूषण पारंगे,कैलास म्हात्रे,महादेव गडगे,सरपंच रीतु ठोंबरे, पंचायत समिती सदस्य.गौरी गडगे, सौ.अर्चना भोईर,वृषाली,कामगार प्रतिनिधी सुरेश गावडे यांच्यासह कामगार, कामगार प्रतिनिधी उपस्थित होते.

## अपंगत्वावर मात करीत मूर्तिकार संतोष सुतार यांची प्रेरणादायी कलासाधना

**माणगाव : बातमीदार**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र गणरायाच्या आगमनाची तयारी सुरू असताना, श्री क्षेत्र नाते गावातील श्री सोमजाई कला केंद्र येथे मात्र गणेशमूर्तींना अंतिम रूप देण्यासाठी मूर्तिकारांची लगबग सुरू आहे. गेल्या तब्बल ५० वर्षांपासून गणपती व देवीच्या मूर्ती घडविण्याचा वडिलोपार्जित पारंपरिक वारसा सुतार कुटुंबीयांकडून जपला जात आहे.

याच पारंपरिक कलेचा वारसा पुढे नेत असलेले मूर्तिकार संतोष बबन सुतार हे जन्मजात पायाने अपंग असूनही आपल्या अंगी असलेल्या असामान्य कलागुणांच्या जोरावर मूर्तिकलेत आपली स्वतंत्र ओळख निर्माण करीत आहेत. शारीरिक अडचणींवर मात करत त्यांनी मेहनत, चिकाटी आणि कलासाधनेच्या बळावर गणपती व देवीच्या आकर्षक मूर्ती घडविण्याची परंपरा कायम ठेवली आहे.

मातीला आकार देताना केवळ हातांची कला नव्हे, तर मनातील श्रद्धा, कल्पकता आणि कौशल्य यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या मूर्तीकामातून पाहायला मिळतो. गणरायाच्या चेहऱ्यावरील भाव, डोळ्यांची ठेवण, मुकुटाची नक्षी, अलंकार आणि मूर्तीच्या प्रत्येक बारकाव्याला ते अत्यंत बारकाईने अंतिम रूप देतात.

सध्या गणेशोत्सव जवळ आल्याने गणरायाला आपल्या आखणी कलेने शेवटचा आकार देताना संतोष सुतार यांची लगबग सुरु आहे. त्यांच्या मूर्तींना भाविकांकडूनही चांगली पसंती मिळत आहे.शारीरिक अपंगत्व ही मर्यादा नसून इच्छाशक्ती, मेहनत आणि अंगी असलेली कला यांना संधी दिल्यास कोणतेही क्षेत्र गाठता येते, याचे प्रेरणादायी उदाहरण संतोष सुतार यांनी आपल्या कलासाधनेतून समाजासमोर ठेवले आहे.



# सात्त्विक-चिराग जोडीची उपांत्य फेरीत धडक

**शेनझेन : वृत्तसंस्था**

सात्त्विक साईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी या भारतीय जोडीने चीन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेतील पुरुष दुहेरीची उपांत्य फेरी गाठली; मात्र पुरुष एकेरीतील किदांबी श्रीकांतचे आव्हान संपुष्टात आले. सात्त्विक साईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी या जोडीने उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत किम अॅस्ट्रप-अँडर्स रासमुसेन या जोडीवर तीन गेममध्ये मात केली. भारतीय जोडीने पहिला गेम २१-१३ असा जिंकत १-० अशी आघाडी मिळवली; मात्र पुढील



गेममध्ये भारतीय जोडीला २१-१६ अशी हार पत्करावी लागली.

सात्त्विक-चिराग जोडीने अखेरच्या गेममध्ये दबावाखाली आपला खेळ उंचावला. त्यांनी हा गेम २१-१८ असा आपल्या नावावर करीत अंतिम चार फेरीमध्ये प्रवेश केला. भारतीय जोडीने एक तास दहा मिनिटांत विजयाला गवसणी घातली. किदांबी श्रीकांतचा या स्पर्धेतील प्रवास उपांत्यपूर्व फेरीतच संपला. हाँगकाँगच्या ली चुक यियूने त्याचा सरळ

## किदांबी श्रीकांतचे आव्हान संपुष्टात

दोन गेममध्ये पराभव केला. ३३ वर्षीय किदांबी श्रीकांतने यावर्षी अमेरिकन ओपन सुपर ३०० स्पर्धेत उपविजेतेपद मिळवताना आपल्या जुन्या दमदार खेळाची झलक दाखवली होती; मात्र चीन मास्टर्सच्या उपांत्यपूर्व फेरीत त्याला १६-२१, १६-२१ असा पराभव स्वीकारावा लागला.

याआधीच्या फेरीत किदांबी श्रीकांतने कॅनडाच्या व्हिक्टर लेईचा २१-१८, २१-१९ असा पराभव केला होता. ली चुकविरुद्ध मात्र किदांबी श्रीकांतला सुरुवातीपासूनच संघर्ष करावा लागला. पहिल्या गेममध्ये त्याने ३-० अशी आघाडी घेतली; पण ली चुकने सलग तीन गुण मिळवत ३-३ अशी बरोबरी केली. त्यानंतर त्याने सलग सहा गुण मिळवत १४-६ अशी मोठी आघाडी घेतली. किदांबीने पुनरागमनाचा प्रयत्न केला; पण ली चुकने पहिला गेम जिंकला. दुसऱ्यामध्येही किदांबीने ४-० अशी चांगली सुरुवात केली, मात्र ली चुकने ४-४ अशी बरोबरी साधली होती.

# राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंगमध्ये रायगडच्या खेळाडूंची सुवर्ण कामगिरी

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

पेण येथील हनुमान व्यायामशाळेच्या स्पेशल चाइल्ड खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर घवघवीत यश मिळवत रायगड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. गाझियाबाद, उत्तर प्रदेश येथे २ सप्टेंबर रोजी झालेल्या स्पेशल चाइल्ड राष्ट्रीय ऑलिम्पियाड पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगड संलग्न असलेल्या पेण येथील हनुमान व्यायामशाळेचे जितेश साजेकर हे महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग संघातून सहभागी झाले होते.

या स्पर्धेत त्यांना ५३ किलो वजनी गटात सुवर्णपदक प्राप्त झाले, तर ७४ किलो वजनी गटात यश पांगत यांना उत्तेजनार्थ ट्रॉफी देण्यात आली. या दोन्ही खेळाडूंना हनुमान व्यायामशाळा पेणचे प्रशिक्षक व राष्ट्रीय खेळाडू राजेश अनगत यांचे प्रशिक्षण लाभले असून




शालेय प्रशिक्षक अमोल काईनकर (सुचित जीवन ट्रस्ट) यांचे मार्गदर्शन आहे. रायगड जिल्ह्याच्या या खेळाडूंनी यापूर्वीही राष्ट्रीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्यामुळे त्यांची दखल म्हणून जिल्हा संघटनेने सत्कार केला होता.

या कामगिरीबाबत पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य संघटनेचे उपाध्यक्ष गिरीश वेदक व पॉवरलिफ्टिंग रायगडचे सचिव अरुण पाटकर, सहसचिव सचिन भालेराव, सदस्य सुभाष टेंबे, संदीप कृष्णा पाटकर, ज्येष्ठ खेळाडू माधव पंडित, खजिनदार राहुल गजरमल, सहाय्यक रामचंद्र गावडे आणि महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशन, मुंबईचे सचिव शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त संजय सरदेसाई यांनी समाधान व्यक्त केले असून खेळाडू व त्यांच्या प्रशिक्षकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# खराब खेळानंतरही झ्वेरेवची विजयी घोडदौड कायम

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

ग्रँडस्लॅम कारकीर्दीत प्रथमच अग्रमानांकित म्हणून खेळणाऱ्या जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेवला अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत सलग दुसऱ्या सामन्यात पाच सेटपर्यंत झुंजावे लागले. यानंतरही झ्वेरेवला विजय मिळवण्यात यश आले. मात्र याबाबत तो फारसा समाधानी नव्हता. दुसऱ्या फेरीतील लढतीत माझी कामगिरी अत्यंत खराब होती, असे सामन्यानंतर झ्वेरेव म्हणाला.



फ्रेंच स्पर्धेतील विजेतेपदानंतर झ्वेरेवकडून अपेक्षा वाढल्या. अमेरिकन स्पर्धेतही त्याने आगेकूच कायम राखली असली, तरी अद्याप त्याला सर्वोत्तम खेळ करता आलेला नाही. पहिल्या फेरीत त्याला लॉरेन्झो सोनेगोने पाच सेट झुंजवले. आता दुसऱ्या फेरीत फ्रान्सच्या क्वेंटिन हॅलिसने पुन्हा एकदा पाच सेटपर्यंत त्याच्या क्षमतेची कसोटी पाहिली. झ्वेरेवने ही लढत ६-४, ४-६, ७-६ (७-३), ६-७ (३-७), ६-३ अशी जिंकली. झ्वेरेव एकंदर कामगिरीबाबत नाखूश असला, तरी विजय मिळवणे सर्वांत महत्त्वाचे असे सांगत त्याने लवकरच सर्वोत्तम लय मिळण्याचा विश्वास व्यक्त केला.

पहिल्या दोन लढतींत संघर्ष करावा लागला हे खरे असले तरी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या मी चांगल्या स्थितीत आहे. मी खराब खेळूनही जिंकत आहे. जेव्हा तुम्ही सर्वोत्तम टेनिस खेळत नसता, तेव्हा कसे जिंकायचे हे माहीत असणे हेदेखील एक कौशल्य आहे, असे झ्वेरेव म्हणाला.

# नैनीझीलच्या लाटांवर रंगणार जलक्रीडेचा थरार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

उत्तराखंडमधील नैनितालच्या प्रसिद्ध नैनीझीलमध्ये रविवारी (दि. ६) जलक्रीडा आणि साहसी खेळांचा थरार पाहायला मिळणार आहे. नैनिताल अक्वॅटिक अँड अॅडव्हेंचर स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने वार्षिक अक्वॅटिक मीट आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत देशभरातील २००हून अधिक जलतरणपटू आणि कयाकिंगपटू सहभागी होणार आहेत.



येथील नासा क्लब-सेंट जोसेफ बोट हाऊस येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. लहान मुलांपासून अनुभवी खेळाडूंपर्यंत सर्वांना सहभागी होता यावे यासाठी स्पर्धेचे पाच वयोगट करण्यात आले आहेत. १० वर्षांखालील, १० ते १४ वर्षे, १५ ते २० वर्षे, २१ ते ३० वर्षे आणि ३१ ते ४० वर्षे असे हे वयोगट आहेत. यामुळे विविध वयोगटातील जलतरणपटूंना आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळणार आहे. अक्वॅटिक मीटमध्ये जलतरणाच्या विविध प्रकारांमध्ये खेळाडू सहभागी होणार आहेत. यामध्ये फ्री स्टाइल, ब्रेस्टस्ट्रोक, बटरफ्लाय आणि बॅकस्ट्रोक या प्रकारांचा समावेश आहे.

नैनीझीलच्या पाण्यावर होणाऱ्या या स्पर्धेत खेळाडूंचा वेग, तंत्र आणि सहनशक्तीची कसोटी लागणार आहे. या आयोजनाचे वैशिष्ट्य केवळ जलतरण स्पर्धेपुरते मर्यादित नाही. कयाकिंगमध्ये खेळाडूंच्या वेगासोबतच संतुलन आणि कौशल्याची परीक्षा होणार आहे.नासाचे उपाध्यक्ष रोहित गर्ग यांच्या माहितीनुसार, जलतरण आणि कयाकिंगसोबत विंड सर्फिंग आणि डायव्हिंगचे प्रात्यक्षिक तसेच संबंधित उपक्रमही आयोजित केले जाणार आहेत. त्यामुळे जलक्रीडा प्रेमींसाठी हा कार्यक्रम विशेष आकर्षणाचा ठरणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रति खेळाडू १०० रुपये नोंदणी शुल्क ठेवण्यात आले आहे.

दरम्यान, इच्छुक खेळाडूंना नासाच्या माध्यमातून आता नोंदणी करता येणार आहे. याशिवाय स्थानिक तरुणांना जलक्रीडेकडे आकर्षित करण्यासाठी नासाकडून वर्षभराची सदस्यताही उपलब्ध करून दिली जाते. १२० रुपयांमध्ये वार्षिक सदस्यत्व घेऊन कयाकिंग, जलतरण आणि इतर जलक्रीडांचे प्रशिक्षण घेता येते. नैनितालमधील जलक्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देणे आणि नवोदित खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या आयोजनामागचा प्रमुख उद्देश आहे.

# मुंबई संघाचा प्रवास आता जगासमोर

## आगामी हंगाम आपल्या कॅमेऱ्यात कैद करण्यासाठी एमसीए प्रयत्नशील



**मुंबई : प्रतिनिधी**

विक्रमी ४२ वेळच्या रणजी विजेत्या मुंबई संघाचा पडद्यामागचा प्रवास आता जगभरातील क्रिकेटप्रेमींसमोर येण्याची शक्यता आहे. मुंबई क्रिकेट संघटनेने आगामी देशांतर्गत हंगामात वरिष्ठ संघाचा संपूर्ण प्रवास चित्रबद्ध करून त्यावर आधारित माहितीपट किंवा मालिका तयार करण्याचा निर्णय घेतला असून, त्यासाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडून आवश्यक परवानगी मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

मुंबई संघाच्या तयारीपासून ते अखेरच्या सामन्यापर्यंतचा प्रवास कॅमेरात टिपण्याची एमसीएची योजना आहे. खेळाडूंची सराव सत्रे, सामन्यापूर्वीची तयारी, संघातील वातावरण, खेळाडूंच्या भावना, आव्हाने व मैदानाबाहेरील घडामोडींचा समावेश केला जाणार आहे. संपूर्ण हंगामात मुंबई संघाने घेतलेली मेहनत आणि त्यांचे नियोजन क्रिकेटप्रेमींना प्रथमच जवळून पाहता येणार आहे. मुंबईच्या वरिष्ठ संघाचा संपूर्ण हंगाम चित्रबद्ध करण्यासाठी आम्ही बीसीसीआयकडे काही परवानग्या मागितल्या आहेत, असे एमसीएचे अध्यक्ष अजिंक्य नाईक यांनी सांगितले.






इनरव्हील क्लब ऑफ पनवेलचे सीमेवरील जवानांसोबत रक्षाबंधन...

















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com